
बुधवार, १६ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ११९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

**अंतरंग**
आरसीएफ विस्तारीत प्रकल्पाची जनसुनावणी बारगळली/२
आमदार प्रशांत ठाकूर यांनी मिळवून दिली रुग्णाला मदत/५
विंडीजच्या पोलॉर्डचा आयपीएलला अलविदा!/८

## अफझलखानाचा वध करणारा शिवपुतळा उभारणार



**मुंबई :** प्रतापगडाच्या पायथ्याशी अफजलखान कबरजवळील अतिक्रमण हटवल्यानंतर राज्य सरकारने आणखी एक मोठा निर्णय घेतला आहे. अतिक्रमण काढलेल्या ठिकाणी आता अफजलखानाचा कोथळा बाहेर काढणारा देखावा असणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारणार येणार आहे. याचसोबत या ठिकाणी लाईट आणि साउंड शो सुरू करण्यात येणार आहे. राज्याचे पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी ही घोषणा केली. राज्य सरकारने शिवप्रताप दिनाचे औचित्य साधत प्रतापगडावरील अफजलखानच्या कबरीसमोरील अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले होते. १० नोव्हेंबर रोजी प्रतापगडाच्या पायथ्याला अफजलखानाचा वध करण्यात आला होता आणि याच दिवशी अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. राज्य सरकारच्या या निर्णयानंतर सर्व स्तरातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# ठाकरे गटाला मोठा धक्का

## ■ निवडणूक आयोगाविरोधातील याचिका फेटाळली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली उच्च न्यायालयाने ठाकरे गटाची याचिका फेटाळली असून आणखी एक धक्का दिला आहे. ठाकरे गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह गोठविण्याच्या निर्णयाविरोधात दिल्ली हायकोर्टात धाव घेत आव्हान दिले होते, मात्र हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली. त्याचप्रमाणे निवडणूक आयोगाला या संबंधी तातडीने निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे गट या दोन्ही गटांनी शिवसेना या पक्षनावावर व धनुष्य-बाण या निवडणूक चिन्हावर दावा केला होता. दोन्ही गटांनी सादर केलेल्या लेखी निवेदन व पुराव्याच्या आधारे केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ ऑक्टोबर रोजी पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठविण्याचा हंगामी निर्णय घेतला. या हंगामी निर्णयाविरोधात शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाने दिल्ली हायकोर्टात आव्हान दिले होते. त्यावर कोर्टाने मंगळवारी (दि. १५) निर्णय दिला.




### दिल्ली हायकोर्टाचा निर्णय

निवडणूक आयोगाचा अधिकार मान्य करीत दिल्ली हायकोर्टाने शिवसेनेची याचिका फेटाळली. पक्षचिन्हाच्या निर्णयाचे अधिकार हे निवडणूक आयोगालाच आहेत. त्यामध्ये कोर्ट पडत नाही. त्यामुळेच पक्षचिन्हाचा अंतिम निर्णय होईपर्यंत धनुष्यबाण गोठविलेलेच असेल, असे कोर्टाने सुनावणीवेळी स्पष्ट केले.

निवडणूक आयोग पक्षनाव व निवडणूक चिन्ह गोठवू शकत नाही. आयोगाच्या निर्णयामुळे माझ्या वडिलांनी निश्चित केलेले पक्षाचे नाव व चिन्ह याचा मला वापर करता येत नाही, असा युक्तिवाद शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या वतीने या वेळी करण्यात आला. पक्षनाव व चिन्ह गोठविण्याचा केंद्रीय निवडणूक आयोगाचा हंगामी निर्णय बेकायदा असून पक्षाचे सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत, असा दावा करून या निर्णयाचा गंभीर परिणाम आम्हाला भोगावा लागत आहे. सर्व कागदपत्रांचा व त्या संदर्भातील परिणामांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय केंद्रीय निवडणूक आयोगाला चिन्ह गोठविण्याचा निर्णय घेता येणार नाही, असाही युक्तिवाद ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आला होता, मात्र कोर्टाने तो फेटाळून लावत निवडणूक आयोगाचा निर्णय कायम ठेवला.

# महाड एमआयडीसीतील प्रसोल कंपनीत वायूगळती

## एका कामगाराचा मृत्यू, दुसरा अत्यवस्थ



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील प्रसोल केमिकल या कारखान्यात सोमवारी (दि. १४) रात्री ९च्या सुमारास वायूगळती झाली. यात एक कामगार जागीच मृत्युमुखी पडला, तर अन्य एक कामगार अत्यवस्थ असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जितेंद्र भागुराम आडे (वय ४०) असे मयत कामगाराचे नाव आहे.

प्रसोल केमिकल कारखान्यात फिनिश गोडावूनजवळील अनलोडिंग विभागात जितेंद्र भागुराम आडे हा माथाडी कामगार कॉस्टिक लिक्विड खाली करण्याचे काम करीत होता. या वेळी त्यांच्यासमवेत मिलिंद मोरे हेही होते. तेथे सुमारे ९च्या सुमारास वायूगळती झाली आणि जितेंद्र आडे व मिलिंद मोरे यांना या विषारी वायूची बाधा झाली. या दोघांना महाडमधील देशमुख हॉस्पिटल येथे नेण्यात आले, पण यातील आडे यांना ग्रामीण रुग्णालयात स्थलांतर करण्यात आले. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले.

### संतप्त ग्रामस्थांचा उद्रेक

मयत कामगार जितेंद्र आडे हा वाळण गावातील असल्याने तेथील ग्रामस्थ संताप व्यक्त करीत कंपनीच्या गेटवर जमा झाले. या वेळी कंपनीच्या फलकाची मोडतोड करीत सुरक्षा गार्डच्या कार्यालयावर दगडफेक करण्यात आली. त्यामुळे या ठिकाणी तणाव निर्माण झाला. प्रसोल कंपनीत यापूर्वीदेखील अपघाताच्या घटना घडल्या असून सर्वसामान्य कामगाराला जोपर्यंत नुकसानभरपाई मिळत नाही तोपर्यंत वाळण ग्रामस्थ गप्प बसणार नाहीत, अशी भूमिका या वेळी शशिकांत कालगुडे यांनी मांडली. महाड औद्योगिक पोलीस आणि शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जमावाला शांत करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

# भ्रष्टाचारमुक्त गरीब कल्याणाला प्राधान्य

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

घर, शौचालय, गॅस, पाणी यांसारख्या सुविधा कोणत्याही भ्रष्टाचाराविना गोरगरीबांपर्यंत पोहचविल्या हे मोदी सरकारच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १५) केले. भाजप प्रदेश कार्यालयात धन्यवाद मोदीजी कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्यातील १० लाख लाभार्थ्यांची आभाराची पत्रे पाठविण्याच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.





भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, सहकारमंत्री अतुल सावे, भाजप प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, अ‍ॅड. माधवी नाईक, अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष एजाज देशमुख, अभियानाच्या संयोजिका श्वेता शालिनी आदी या कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाबाबत पूर्वीही देशात बोलले जात असे, मात्र हे कार्यक्रम कधी प्रत्यक्षात आले नव्हते. मोदी सरकारने गरीब कल्याण हे एकमेव उद्दिष्ट ठेवून अनेक योजना सुरू केल्या. एक पैशाचाही भ्रष्टाचार न होता या योजनांचे लाभ गोरगरीबांपर्यंत पोहचत आहेत. धर्म, जात, पंथ न पाहता गरीबांपर्यंत कल्याणकारी योजनांचे लाभ पोहचविले जात आहेत. (पान २ वर..)

## जितेंद्र आव्हाडांना अटकपूर्व जामीन

**ठाणे : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार व माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांना ठाणे न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

रिदा रशीद यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुंब्रा पोलीस ठाण्यात आव्हाडांविरोधात गुन्हा दाखल झाला होता. यानंतर आव्हाड यांनी ठाणे कोर्टात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. १५ हजारांच्या जातमुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# माजी आमदार मनोहर भोईर यांचे कट्टर समर्थक भाजपमध्ये दाखल

## ■ शिवसेनेसह राष्ट्रवादी, काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांचा प्रवेश



### मंत्री रवींद्र चव्हाण व आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवून मंगळवारी (दि. १५) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झालेल्या कार्यक्रमात राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि आमदार महेश बालदी यांच्या हस्ते त्यांना पक्षाची शाल देऊन भाजपमध्ये स्वागत केले.

या कार्यक्रमास भाजपचे उरण तालुकाध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्यासह (पान २ वर..)

## कै. सचिन सचदेव यांची आज पगडी रसम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेलमधील हॉटेल उद्योजक सचिन नंदलाल सचदेव यांचे सोमवारी (दि. १४) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ४६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगी, दोन विवाहित बहिणी असा परिवार आहे.

भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी सचिन सचदेव यांचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

कै. सचिन सचदेव यांची पगडी रसम बुधवारी (दि. १६) पनवेलमधील झुलेलाल मंदिर, पुज्य सिंधी पंचायत हॉल या ठिकाणी सायंकाळी ५ ते ५.३० वा. होणार आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वंचितांना मुख्य प्रवाहात आणले

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन; भगवान बिरसा मुंडा यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकरी, आदिवासी समाजातील लोकांना पूर्वी शिक्षणासह अनेक गोष्टींमध्ये अडथळे येत होते, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तळागाळातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले टाकली. त्यामुळे त्यांच्या जीवनात नवी क्रांती झाली, असे प्रतिपादन भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १५) केले.

आदिवासी जननायक भगवान बिरसा मुंडा यांची जयंती राष्ट्रीय जनजाती गौरव दिन म्हणून पनवेल तालुक्यातील गाढेश्वर मंदिर येथे साजरा करण्यात आला. वनवासी कल्याण आश्रमच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच आदिवासी समाजाच्या हितासाठी भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटीशांविरुद्ध केलेला संघर्ष उल्लेखनीय आहे. या महापुरुषाचे जयंतीनिमित्त स्मरण करून अभिवादन करण्यात आले.



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

वनवासी कल्याण आश्रमाचे कुलाबा जिल्हा अध्यक्ष अविनाश म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास उदय टिळक, प्रमुख वक्ते कृषी शिक्षक अशोक भगत, भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, रमेश पाटील, शांताराम चौधरी, वाजे सरपंच राजेश भालेकर, दुंदरे सरपंच अनुराधा वाघमारे, मालडुंगी सरपंच हर्षदा चौधरी, एकनाथ वाघे, मोहन मुजुमदार, विष्णू सफरा, रमेश भिडे, विष्णू वाघमारे, सुधीर कांडपिळे, नारायण भगत, सुरेश वाघे, सुदाम पवार, संदीप शिंदे, गणपत भगत, गुरूनाथ ढुमणे, गजानन कातकरी, राजेश भोईर, अनिता सफरा, लता भगत, बेबी भगत, रत्नाकर जाधव, लक्ष्मण शीद, पद्माकर वाघ, शांताशेठ शेळके, जोमा निरगुडा, जनार्दन निरगुडा आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### अबू आझमींशी संबंधित २०हून अधिक ठिकाणी छापे

**मुंबई :** समाजवादी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांच्याशी संबंधित सुमारे २०हून अधिक ठिकाणांवर आयकर विभागाने छापे टाकले आहेत. बेनामी संपत्ती आणि काळ्या पैशासंबंधी ही कारवाई असल्याचे सांगितले जात आहे. मुंबई, वाराणसी, कानपूर, दिल्ली, कोलकाता, लखनऊसह इतरही ठिकाणांवर ही छापेमारी झाली आहे.

### गोवर संसर्ग रोखण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश

**मुंबई :** गोवर संसर्गाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन मुंबई महापालिकेने आवश्यक त्या सर्व उपाययोजना तत्काळ कराव्यात आणि संसर्ग आटोक्यात राहील याची काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. गोवर संसर्ग वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मनपा प्रशासक इक्बाल सिंह चहल यांच्याशी दूरध्वनीवरून बोलून सूचना दिल्या तसेच पालिकेचा आरोग्य विभाग कोणती खबरदारी घेत आहे ते जाणून घेतले.

# १२० अश्वशक्तीवरील यांत्रिकी नौकांनाही डिझेल कोटा मंजूर

## मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा निर्णय



### उरणचे आमदार महेश बालदी यांची मागणी व पाठपुरावा कामी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मत्स्यव्यवसाय विभागाच्या ३१ मार्च २००८च्या शासन निर्णयामध्ये योग्य ती सुधारणा करून मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या सहा सिलिंडरच्या १२० अश्वशक्ती व त्यावरील यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराची प्रतिपूर्ती करण्याबाबत निर्णय करण्यात आल्याची माहिती राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. या निर्णयाचा हजारो मत्स्यव्यवसायिकांना लाभ होणार असून या संदर्भात आमदार महेश बालदी यांची मागणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.

१२० अश्वशक्तीवरील इंजिन क्षमता असणाऱ्या नौकांना डिझेल कोटा व प्रतिपूर्ती मंजूर करण्याबाबतच्या शासन निर्णयात सुधारणा करण्याची विनंती उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांनी केली होती. त्या अनुषंगाने मत्स्यव्यवसाय विभागाच्या निर्णयात योग्य ती सुधारणा करून मच्छीमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या सहा सिलिंडरच्या १२० अश्वशक्ती व त्यावरील यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेल तेलावरील मूल्यवर्धित कराची प्रतिपूर्ती करण्याबाबत निर्णय करण्यात आला आहे. (पान २ वर..)



# सामान्यांना समोर ठेवून नियमावली तयार करावी

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सुशासन समिती बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

सामान्य नागरिकांच्या समस्यांचे तत्परतेने निराकरण होण्याच्या दृष्टीने आणि शासकीय कामात सुसूत्रता आणि पारदर्शकता असणे आवश्यकता आहे. यासाठी सामान्य व्यक्तीला समोर ठेवून आदर्श अशी कार्यप्रणाली तसेच सुशासन नियमावली तयार करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. १५) दिल्या.



उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सुशासन नियमावली तयार करण्याकरिता नियुक्त समिती समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सुशासन नियमावलीचा उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी आढावा घेतला. लवकरात लवकर प्रारूप आराखडा सादर करण्याचे निर्देश समिती सदस्यांना दिले. या बैठकीस या समितीचे अध्यक्ष निवृत्त तत्कालीन उपलोकायुक्त सुरेश कुमार, माजी मुख्य सचिव तथा समिती सदस्य जयंतकुमार बांठिया, स्वाधीन क्षत्रिय, अजितकुमार जैन, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांचे विविध प्रश्न त्याचप्रमाणे शासन स्तरावरील विविध कामे ही गावपातळीवरच निकाली निघाली पाहिजेत. त्याचप्रमाणे तालुका पातळीवरील कामे तालुक्याच्या ठिकाणी तर जिल्हास्तरीय कामे ही जिल्हा पातळीवरच निकाली निघाली पाहिजेत. ग्रामीण जनतेला शासन विविध सेवा देत असून प्रत्येक नागरिकाला ह्या सेवासुविधा विनासायास मिळायला पाहिजेत.

प्रशासनात माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर अधिक प्रभावीपणे करण्याची गरज नमूद करून शासन सर्वसामान्य जनतेला देत असलेल्या सेवा आधार कार्डशी संलग्न करण्याची गरज उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. या सुशासनासाठी आदर्श अशी नियमावली तयार करण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

या वेळी समिती अध्यक्ष सुरेश कुमार व सदस्यांनी समितीने केलेल्या कार्याबाबतची माहिती दिली.

### तक्रारींचा वेळेत निपटारा करावा

***शासनाच्या विविध विभागांची उपयुक्त माहिती सोप्या भाषेत नागरिकांना तत्काळ मिळायला हवी. सामान्य नागरिकांच्या प्राप्त होणाऱ्या तक्रारी विहित वेळेत निकाली निघाल्या पाहिजेत, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.***

# आरसीएफच्या विस्तारीत प्रकल्पाची जनसुनावणी बारगळली





**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थळ येथील आरसीएफ प्रकल्पाच्या विस्तारीकरणासंदर्भात मंगळवारी (दि. १५) पर्यावरण विषयक जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते, मात्र जिल्हाधिकारी किंवा त्यांचा कुणीही प्रतिनिधी याकडे फिरकलाच नाही. त्यामुळे ही सुनावणी बारगळली.

सुनावणीसाठी आलेल्या शेकडो नागरिकांनी दोन तास ताटकळत बसावे लागल्याने तीव्र नाराजी व्यक्त करीत गोंधळ घातला. जोपर्यंत जुन्या प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत सुनावणी होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका आमदार महेंद्र दळवी यांनी मांडली.

केंद्र सरकारच्या अखत्यारीतील अलिबाग तालुक्यातील थळ येथील राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) कंपनीचा एक हजार २०० एमटीपीडी क्षमतेचा एमपीके, डीएपी कॉम्प्लेक्स फर्टिलायझर्सचा प्रकल्प प्रस्तावित आहे.

हा प्रकल्प स्थापित करण्यासाठी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांच्यातर्फे पर्यावरण विषयक जनसुनावणी चोंढी येथील साई इन हॉटेल येथे मंगळवारी दुपारी १ वाजता आयोजित केली होती, मात्र या जनसुनावणीत जिल्हाधिकारी किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत. यामुळे ही जनसुनावणी रद्द करण्यात आली.

यामुळे सुनावणीसाठी उपस्थित परिसरातील हजारो नागरिकांना दोन तास ताटकळत राहावे लागले. यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. जवळपास अडीच वाजल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी तेथे आले आणि त्यांनी सुनावणी होणार नसल्याचे जाहीर केले.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सुनावणी होणार नसल्याचे जाहीर होताच, तेथे जमलेल्या नागरिकांनी एकच गोंधळ घालत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. जिल्हाधिकारी येणार नव्हते मग त्याबाबत आम्हाला आधीच का कळवले नाही, असे विचारत त्यांनी नाराजी व्यक्त केली.

> **जिल्हाधिकारी अथवा कोणीही प्रतिनिधी सुनावणीस आले नाहीत. यामुळे आज होणारी जनसुनावणी रद्द करण्यात आली.**
>
> **–व्ही. व्ही. किल्लेदार, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ**

# प्रत्येक नोडमध्ये इंग्रजी शाळा सुरू करणार

## आमदार गणेश नाईक यांची घोषणा

**नवी मुंबई : बातमीदार**

जनतेसाठी आरोग्य आणि शिक्षण हे अतिमहत्त्वाचे विषय असून नवी मुंबईतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी शहरातील प्रत्येक नोडमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा आणि कर्करोगाचे वाढणारे प्रमाण पाहता महापालिकेच्या रुग्णालयांमधून उपचारासाठी बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्याची घोषणा आमदार गणेश नाईक यांनी मंगळवारी (दि. १५) महापालिकेतील बैठकीत केली.



या वेळी माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबईमध्ये सोयीसुविधा पुरवणे हे एमआयडीसी आणि सिडकोची जबाबदारी आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये सुविधांसाठी टाकलेली आरक्षणे भूखंड सिडकोने विकता कामा नये अशी ठाम भूमिका आमदार नाईक यांनी घेतली आहे. त्याचबरोबर विविध सुविधांसाठी एमआयडीसीने महापालिकेकडे हस्तांतरित केलेले भूखंड एमआयडीसी परस्पर दुसऱ्यांना विकत आहे. नाईक यांनी केलेल्या सूचनेनुसार महापालिका आयुक्त नार्वेकर यांनी सिडको व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक झाली आहे. येत्या १५ दिवसांत याबाबत अपडेट आपल्याला कळवावे, अशी सूचना नाईक यांनी केली.

कर्करोगाच्या उपचारासाठी ओपीडी सुरू करावी. रुग्णालयांमधून पुरेसा औषधसाठा उपलब्ध करावा असे सुचवले. मुंबई महापालिकेच्या प्रशासनासोबत नवी मुंबई पालिकेच्या प्रशासनाने गांभीर्याने याबाबत चर्चा करून मुंबईमुळे नवी मुंबईत वायू प्रदूषण होणार नाही, यासाठी कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली.

मुंबई व नवी मुंबईला कल्याण–डोंबिवलीला जोडणाऱ्या ऐरोली–काटई उड्डाणपुलाचे काम सुरू झाले, मात्र या ठिकाणी चढण्यासाठी आणि उतरण्यासाठी मार्गिका तयार करण्याची मागणी संदीप नाईक यांनी केली होती. एमएमआरडीएचे अधिकारी हा उड्डाणपूल पूर्ण होण्याअगोदर या दोन्ही मार्गिका बांधून पूर्ण करीत नाहीत तोपर्यंत या उड्डाणपुलाचे उद्घाटन होऊ देणार नाही, अशी आक्रमक भूमिका आमदार नाईक यांनी मांडली.

# शाश्वत फाउंडेशनतर्फे बिरसा मुंडा जयंती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

शाश्वत फाउंडेशन व श्री तेरापंथ जैन महिला मंडळातर्फे खारघर परिसरातील धामोळे येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी महान स्वातंत्र्य सेनानायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांना फळे व खाऊचे वाटप करण्यात आले.

बीना गोगरी यांनी आदिवासी जननायक 'धरती अबा' बिरसा मुंडा यांच्या जीवनकथेच्या माध्यमातून त्यांचा इतिहास मुलांना सांगितला. या कार्यक्रमाच्या वेळी अंजू पटेल, मंजुला बाबेल, अरुणा सोनी, रेखा जैन, आराधना वर्शने आदी उपस्थित होते.



# शेतकरी नोंदणीकरिता मुदतवाढ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

खरीप पणन हंगाम २०२२–२३मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता ऑनलाइन पोर्टलवर शेतकरी नोंदणीकरिता बुधवार (दि. ३०)पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

या नोंदणीकरिता १० नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि ऑनलाइन पोर्टलवरील माहितीनुसार, मागील हंगामाचा विचार करता शेतकरी नोंदणी पुरेशी झाली नाही. त्यामुळे नोंदणीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे.

चालू हंगामामध्ये पुरेशा प्रमाणावर शेतकरी नोंदणी व्हावी, याकरिता यापूर्वी सूचित केल्यानुसार आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान व भरडधान्य खरेदीकरिता नोंदणी सुरू झाली आहे, असे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अवर सचिव संतोष कराड यांनी कळविले आहे.

# बालदिनानिमित्त 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांची वृद्धाश्रमास भेट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) विद्यार्थ्यांनी सोमवारी (दि. १४) बाल दिनानिमित्त नेरे येथील स्नेहकुंज आश्रमास भेट दिली.





बाल दिनानिमित्त या सर्व विद्यार्थ्यांनी या वयोवृद्ध आजी–आजोबांना आनंद देण्याचा प्रयत्न केला. अन्नदान व अल्प स्वरूपात आर्थिक मदतीच्या स्वरूपात या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील निराधार आजी–आजोबांना आपल्या परीने मदतीचा खारीचा वाटा देण्याचा प्रयत्न केला. एनएसएसमधील ध्वनी सावंत, निकिता, दीपिका, अलिषा, शुभांगी, करिष्मा प्रधान, तेजस्व वासुकर, रिया पवार, स्नेहल पाटील, प्रीती झगडे, जानवी नाळे या विद्यार्थ्यांनी पोवाडा, गीत गायन, भजन, नृत्य, ओवी, कविता वाचन, कथाकथन अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून वृद्धांचे मनोरंजन केले. काही आजी–आजोबांनी विद्यार्थ्यांसोबत नृत्य करून आपला आनंद व्यक्त केला. 'सावधान, घर अबोल होत आहे' या विषयावर श्रवण कदम याने भाषण सादर केले.

प्रधान आजींनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना भविष्यकाळात आपले शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. नेहमी शांत रहा, परोपकार करा, माफ करायला शिका, जिद्द सोडू नका, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. शेवटी ध्वनी सावंत आणि श्रवण कदम या विद्यार्थ्यांनी आश्रम प्रमुख नितीन जोशी आणि संगीता जोशी यांची मुलाखत घेतली. वृद्धाश्रमे कायमची बंद व्हायला हवीत आणि तुम्ही विद्यार्थ्यांनी लग्नानंतरच्या आयुष्यात आपल्या आई–वडिलांप्रमाणेच आपल्या सासू–सासऱ्यांचाही सन्मान राखा त्यांच्याशी प्रेमाने वागा, असा मोलाचा संदेश त्यांनी आपल्या मुलाखतीतून दिला.

एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील व गणेश पाटील यांनी या एकदिवसीय कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक प्रशांत मोरे आणि अजित सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रवण कदम याने केले, तर स्नेहल पाटील या विद्यार्थिनीने आभार मानले.

# माँ भारती वेल्फेअर फाउंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्य, खाऊवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बालदिनाचे औचित्य साधून माँ भारती वेल्फेअर फाउंडेशनतर्फे उलवे सेक्टर ८ येथील किड् झी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे उलवे नोड अध्यक्ष अवधेश कुमार महतो, अनूप मौर्य, अ‍ॅड. सुनील कुमार मौर्य हे उपस्थित होते. फाउंडेशनचे संस्थापक मनोज कुमार मौर्य, मुकेश कुमार अग्रहरी, दीपा मौर्य, रश्मी सिंग आदी सदस्यांनी या कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

दरम्यान, भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे उलवे नोड अध्यक्ष अवधेश कुमार महतो यांनी माँ भारती वेलफेअर फाउंडेशनने केलेल्या कार्याचे कौतुक करताना भविष्यात गरजेच्या वेळी पूर्ण संघटनेसह सहकार्य देणार असल्याचे आश्वासन दिले.



# पनवेल मनपाच्या वतीने प्रभाग कार्यालयांमध्ये शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने पंतप्रधान आत्मनिर्भर योजनेंतर्गत पथविक्रेत्यांना सूक्ष्म पतपुरवठा करण्यासाठी प्रभागनिहाय शिबिर घेण्यात येत आहे. या अंतर्गत नुकतेच पनवेल आणि कामोठे येथे शिबिर घेण्यात आले. या शिबिरास लाभार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



या शिबिरामध्ये बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, कर्नाटका बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया अशा विविध बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने बँकांनाही या पथविक्रेत्यांनी निधीसाठी केलेले अर्ज लवकरात लवकर मंजूर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या शिबिराव्यतिरिक्त प्रत्येक प्रभाग कार्यालयामध्ये यापुढेही पंतप्रधान आत्मनिर्भर निधींचे अर्ज भरण्याचे काम सुरू असणार असल्याची माहिती उपायुक्त कैलास गावडे यांनी दिली. प्रभाग 'ब' काळभैरव मंगल कार्यालय कळंबोली येथे बुधवारी (दि. १६) सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत तसेच प्रभाग 'अ 'खारघर सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत गुरुवारी (दि.१७) शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

पंतप्रधान स्वनिधी योजनेसाठी आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नं. आधारकार्ड नंबरला लिंक पाहिजे, रेशन कार्ड/लाईट बिल अशी कागदपत्रे आवश्यक आहेत. महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त पथविक्रेत्यांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पान १ वरून

## भ्रष्टाचारमुक्त गरीब कल्याणाला प्राधान्य

त्यांनी पुढे बोलताना वेगवेगळ्या योजनेच्या लाभार्थ्यांची पत्रे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवण्याचा प्रदेश भाजपचा उपक्रम अभिनंदनीय आहे. प्रदेश भाजपने ठरवलेले अडीच कोटी लाभार्थ्यांची पत्रे पाठवण्याचे उद्दिष्ट निर्धारित मुदतीत साध्य करण्यासाठी कार्यकर्त्यांनी त्वरेने कार्यरत व्हावे, असेही सांगितले.

राज्यातील १३ कोटी जनतेपैकी पाच कोटी ६५ लाख लोकांना मोदी सरकारच्या वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळाला आहे. यापैकी अडीच कोटी लाभार्थ्यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देणारी पत्रे फेब्रुवारी २०२४पर्यंत पाठविण्याचा संकल्प पक्षाने केला आहे. हे उद्दिष्ट नक्की साध्य करू, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी व्यक्त केला. हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या अल्पसंख्याक मोर्चा, महिला मोर्चा आणि युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते फ्रेंड्स ऑफ बीजेपी या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला तसेच हे अभियान सुरू केल्याबद्दल त्यांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचे अभिनंदन केले.

## माजी आमदार मनोहर भोईर यांचे कट्टर समर्थक भाजपमध्ये दाखल





चंद्रकांत घरत, पंडित घरत, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र म्हात्रे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विजय भोईर तसेच प्रसाद भोईर, राजू भोईर, हेमंत भोईर, चाणजे ग्रामपंचायत सदस्य प्रीतम पाटील, सागर वाघमारे, फराज शेख, सोमनाथ आटपाटकर, अजय म्हात्रे, भाताण ग्रामपंचायत सदस्य तानाजी पाटील, युवा कार्यकर्ते अनिल भोईर, सुमित मुकादम आदी उपस्थित होते.

या वेळी उरण तालुका युवक काँग्रेसचे कैलास भोईर, चाणजे ग्रामपंचायतीच्या सदस्य किंजल कैलास भोईर, माजी आमदार मनोहर भोईर यांचे कट्टर समर्थक जनार्दन रामचंद्र म्हात्रे व त्यांचे मित्र मंडळ यांनी शिवसेनेतून त्याचबरोबर भाताण गावातील काँग्रेसचे अनंत सते, मारूती म्हात्रे यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे मान्यवरांनी स्वागत केले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वंचितांना मुख्य प्रवाहात आणले

शिकून मोठे होण्याची इच्छा, जिद्द मनात असणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकार निश्चितपणे पाठबळ देईल असे सांगून आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकार सर्व घटकांसाठी काम करीत आहे. विविध योजनांच्या माध्यमातून शौचालय, घर उपलब्ध करून देण्यात येत आहे. आता काळानुरूप तुम्हालाही बदलावे लागेल. त्यांनी आपल्या भाषणात आदिवासी समाजातील भगवान बिरसा मुंडा ते आताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा उल्लेख करून त्यांचा आदर्श घेऊन उत्कर्ष साधावा, असे आवाहन केले.

इतर मान्यवरांचीही समयोचित भाषणे झाली, तर प्रमुख वक्ते कृषी शिक्षक अशोक भगत यांनीदेखील मार्गदर्शन केले. आदिवासी समाजातून एमएबीएड झाल्याबद्दल दत्तात्रेय घुटे आणि बीई इलेक्ट्रॉनिक्स झाल्याबद्दल प्रमिला भगवान ढुमणे यांचा या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

## १२० अश्वशक्तीवरील यांत्रिकी नौकांनाही डिझेल कोटा मंजूर

या सुधारणा ३१ मार्च २००८पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आलेल्या असून या संदर्भातील पत्र राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आमदार महेश बालदी यांना दिले असून सोबत मत्स्यव्यवसाय विभागाचे १४ नोव्हेंबर २०२२चे शुद्धीपत्रकही देण्यात आले आहे. या वेळी मोरा सोसायटीचे माजी चेअरमन जयविंद्र कोळी, सूर्यकांत (बबलू) कोळी आदी उपस्थित होते. मच्छीमारांच्या हितासंदर्भात घेतलेल्या या निर्णयाबद्दल मच्छीमार संघटनांनी मत्स्यव्यवसायमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि आमदार महेश बालदी यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मिळवून दिली मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोहिंजण गावातील आयुष पाटील यांच्या अस्थिमज्ञा प्रत्यारोपण करण्यासाठी प्रचंड खर्च येणार आहे. ही माहिती मिळताच भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून त्यांना दोन लाखांची आर्थिक मदत मिळवून दिली आहे. यासंदर्भातील शासनाचे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुष पाटील यांच्या नातेवाईकांकडे सुपूर्द केले आहे.



पनवेल तालुक्यातील रोहिंजण गावातील आयुष विलास पाटील याच्या अस्थिमज्ञा प्रत्यारोपण करण्यासाठी प्रचंड खर्च येणार आहे. ही बाब भाजप कार्यकर्त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कानावर टाकली. त्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुष पाटील यांच्या शस्त्रक्रियेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत मिळावी यासाठी पाठपुरावा केला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याला यश आले असून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आयुष पाटील दोन लाखांची मदत करण्यात आली आहे. या मदतीची रक्कम आयुष पाटील यांच्या खात्यावर हस्तांतर करण्यात आली आहे. यासंदर्भातील शासनाचे पत्र आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुष पाटील यांच्या नातेवाईकांकडे सुपूर्द केले.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

या वेळी माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, माजी नगरसेवक नितीन पाटील, भाजप कार्यकर्ते अजय कांडपिळे, अमर उपाध्याय, कीर्ती नवघरे, रवी म्हात्रे आदी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात गरीब गरजू रुग्णांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू केला आहे. त्यामाध्यमातून भरीव रक्कम रुग्णांना मिळायला सुरुवात झाली आणि त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेदेखील काम करीत आहेत. या मदतीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभारही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी मानले.

## मजदूर चेतना यात्रेचे पनवेलमध्ये भारतीय मजदूर संघातर्फे स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संघटित व असंघटित कामगारांच्या विविध प्रश्नांवर व मागण्यांकरिता भारतीय मजदूर संघातर्फे २१ डिसेंबर रोजी मुंबई येथे महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चासंदर्भात जनजागृती करण्यासाठी भारतीय मजदूर संघातर्फे महाराष्ट्रमध्ये मजदूर चेतना यात्रा काढण्यात येत असून ही यात्रा पनवेलमध्ये आली असता पनवेल तालुका भारतीय मजदूर संघातर्फे या रॅलीचे स्वागत करण्यात आले.



महाराष्ट्रातील संघटित व असंघटित क्षेत्रातील प्रलंबित प्रश्ना बाबतीतच्या मागण्यांसाठी भारतीय मजदूर संघातर्फे २१ डिसेंबर रोजी मंत्रालय मुंबई येथे कामगारांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. ह्या मोर्चाची जनजागृती करण्यासाठी भारतीय मजदूर संघाने ६ ते १७ नोव्हेंबर या काळात महाराष्ट्रमध्ये मजदूर चेतना यात्रेचे आयोजन केले आहे. दोन विभागांत होणाऱ्या या चेतना यात्रेची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मभूमी किल्ले शिवनेरी येथून झाली तर या यात्रेचा समारोप गुरुवारी १७ नोव्हेंबर रोजी ठाणे येथे होणार आहे. ही यात्रा पनवेल येथे आली असता पनवेल तालुका भारतीय मजदूर संघातर्फे या रॅलीचे स्वागत करण्यात आले. या यात्रेनिमित्त स्थानिक कामगारांचे प्रश्न जाणून घेण्याकरिता मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल दुगने, प्रदेश उपाध्यक्ष एस. के. सिंघ, प्रदेश सचिव उमेश महाडिक, कोकण विभाग संघटक हरी चव्हाण, ठाणे विभाग संघटक विद्याधर वडुलेकर, मुंबई विभाग अध्यक्ष बापू दडस, रायगड जिल्हा सचिव अशोक निकम, पनवेल तालुका अध्यक्ष रवींद्र नाईक, जय भारतीय जनरल कामगार संघटना व भाजप रायगड जिल्हा कामगार आघाडीचे अध्यक्ष कामगार नेते जितेंद्र घरत, टॅक्सी युनियन संघटनेचे जगदीश पाटील, निलेश वांगीलकर, कल्पेश म्हात्रे, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

## भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त अभिवादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर मंडलतर्फे आदिवासी जननायक भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश व उत्तर रायगड जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या वतीने महानायक बिरसा मुंडा यांचा जन्मदिवस १५ नोव्हेंबर जनजातीय गौरव दिवस साजरा करण्याचे आवाहन सर्व भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी यांना करण्यात आले होते.

खारघरमंडल क्षेत्रात हेदोरा वाडी, फणस वाडी, चाफेवाडी, बेलपाडा वाडी व धामोळे वाडी असे पाडे अंतर्भूत आहेत. भारतीय जनता पक्षाच्या वतीने या सर्व आदिवासी पाड्यात जननायक बिरसा मुंडा यांच्या कार्याचा इतिहास सर्वसामान्यांना समजावा तसेच प्रत्येक बूथवर त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्याचा कार्यक्रम करण्याचे ठरविले आहे. मंगळवारी (दि. १५) बेलपाडा वाडीत भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून मालार्पण करण्यात आले व आदिवासी बांधवांसह अल्पभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.


या वेळी खारघर मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्यक्ष संजय घरत, अनुसूचित जमाती मोर्चाचे अध्यक्ष दत्ता कांबडी, सस्मित डोळस व अनेक आदिवासी बांधव उपस्थित होते.



पनवेल : आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी लढा देणारे लोकनायक, स्वातंत्र्यसेनानी भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी भाजप मध्यवर्ती कार्यालयात यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष तेजस जाधव, सागर ठाकरे, शंकर कारंडे, अक्षय चिकणे, विनय जाधव, रवींद्र पाटील, रामदास मगर आदी उपस्थित होते.



पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात आदिवासी समाजाचे आद्य प्रवर्तक क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्ताने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, करवसुली विभागप्रमुख हरिश्चंद्र कडू, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, घनकचरा आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी व कर्मचारी उपस्थित होते.



पनवेल : माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी महापालिकेच्या मुख्यालयात क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



कळंबोली : आदिवासी जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त भाजप कळंबोली मंडलतर्फे पक्ष कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

## गाढी नदीत आढळला मृतदेह

**पनवेल :** सुकापूर येथे विठ्ठल मंदिराजवळ, गाढी नदीमध्ये पाण्यावर तरंगत असताना एका अनोळखी पुरुष व्यक्तीचा मृतदेह खांदेश्वर पोलिसांना आढळून आला आहे.

मयत व्यक्तीचे वय २५ ते ३० वर्षे असून त्याची उंची पाच फूट दोन इंच, डोक्याचे केस काळे व वाढलेले आहेत. रंग सावळा व काळपट असून, उजव्या हाताच्या मनगटात काळा धागा, हातावर त्रिशुळासारखे गोंदण काढलेले आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास सहायक निरीक्षक शांतिभूषण कामत यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अनधिकृत होर्डिंगवर महापालिकेची कारवाई

**पनवेल :** पनवेल महापालिका प्रभाग समिती 'अ' खारघरमधील घोट रोडवरील अनधिकृत होर्डिंगवरती आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनुसार मंगळवारी (दि. १५) कारवाई करण्यात आली.

महापालिका प्रभाग समिती 'अ' खारघर मधील घोट याठिकाणी महापालिकेची परवानगी न घेता अनधिकृतपणे उभारलेल्या सुमारे १२ होर्डिंगवर प्रभाग 'अ'चे प्रभाग अधिकारी जितेंद्र मडवी आणि त्यांच्या टिमने कारवाई केली. कटर आणि हायड्राच्या सहाय्याने या होर्डिंगचे साचे पाडण्यात आले.

महापालिका हद्दीत होर्डिंग उभारण्यापूर्वी महापालिकेची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे महापालिकेची पूर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे उभारलेल्या होर्डिंगवरती कडक कारवाई केली जाणार असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी सांगितले.





पनवेल : भाजप युवा मोर्चा कामोठे उपाध्यक्ष तेजस जाधव यांना वाढदिवसानिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणेशठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, सागर ठाकरे, शंकर कारंडे, अक्षय चिकणे, विनय जाधव आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजप कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले रवींद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणेशठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, उपाध्यक्ष तेजस जाधव आदी उपस्थित होते.




पनवेल : भाजपच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात धन्यवाद मोदीजी कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्यातील १० लाख लाभार्थ्यांची आभाराची पत्रे पाठवण्याचा कार्यक्रम मंगळवारी झाला. यामध्ये उत्तर रायगड जिल्ह्यातून जमा झालेले धन्यवाद मोदीजीची कार्ड भाजप महिला मोर्चा पनवेल तालुका व शहरच्या वतीने यादीसह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व प्रदेश संयोजिका श्वेता शालिनी यांना सुपूर्द करण्यात आले. या वेळी अभियानाच्या जिल्हा संयोजिका चारुशीला घरत, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, जिल्हा चिटणीस गीता चौधरी उपस्थित होत्या.

## संपादकीय

# सुन्न करणारी अमानुषता

आजच्या तरुणाईला लुभावणारी आधुनिक जीवनशैली, 'लिव्ह इन'चा आजमावून पहावासा वाटणारा पर्याय आणि सोशल मिडियावरील प्रेमाचे प्रदर्शन असे सारे वरकरणी आकर्षक भासणाऱ्या एका तरुण दाम्पत्याच्या सहजीवनाचा सुन्न करणारा शेवट श्रद्धा वालकरच्या हत्या प्रकरणातून देशासमोर आला आहे. श्रद्धाचा गळा दाबून खून केल्यानंतर तिच्या मृतदेहाचे ३५ तुकडे करून, ते फ्रिजमध्ये भरून ठेवून त्यांची थंडपणाने विल्हेवाट लावणाऱ्या आफताब पुनावालाच्या मानसिकतेची कारणमीमांसा करणे मात्र मानसशास्त्रज्ञांनादेखील कठीण जावे.

**पाश्चात्य राहणीचे सर्रास अनुकरण करणारी आजची तरुणाई शिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्रपणे राहण्याबाबत, विवाहाविना नातेसंबंध अनुभवण्याबाबत आग्रही बनत चालली आहे. विशेषत: कॉल सेंटर क्षेत्रात काम करणारे तरुण-तरुणी या आधुनिक जीवनशैलीकडे सहजतेने वळताना दिसतात. हातात खेळू लागलेला बक्कळ पैसा त्यांना चंगळवादी जीवनशैलीकडे वळवतो आणि मग साहजिकच पारंपरिक विचारसरणीच्या कुटुंबियांचा त्यांना अडसर वाटू लागतो. लिव्ह इन संकल्पना पालकांना समजावून देण्याच्या भानगडीत न पडता मग पालकांशी संबंध तोडून आत्मकेंद्रित जीवन जगणे सोयीचे वाटते. श्रद्धा आणि आफताबच्या बाबतीत असेच काही घडले होते की त्या मागे आणखी काही आहे हे अधिक तपासातून पुढे येईलच, पण तूर्तास तरी, पंचविशी पार केलेल्या या दाम्पत्याचे अवघे जगणे हे ओटीटी प्लॅटफॉर्मवरील एखाद्या मालिकेत शोभून दिसावे असेच भासते आणि त्यांच्या प्रेमकहाणीचा शेवटही ओटीटीवरील एखाद्या क्राइम-सस्पेन्स-थ्रिलरसारखाच झाला आहे. आधुनिक राहणीमान असलेल्या श्रद्धाने आईवडिलांच्या विरोधाला न जुमानता आफताबसोबत लिव्ह इनमध्ये राहण्याचा पर्यायच नुसता निवडला नाही तर मागचे सगळे दोर कापून टाकल्यागत तिने आईवडिलांशी संबंधही जवळपास संपुष्टातच आणले. इतके की ती मुंबई सोडून दिल्लीला स्थलांतरित झाल्याचा पत्ताही तिच्या कुटुंबाला आता आतापर्यंत नव्हता. २०१९च्या मध्यापासून आफताबसोबत लिव्ह इनमध्ये राहू लागलेली श्रद्धा जानेवारी २०२०मध्ये तिची आई वारली तेव्हा दोन आठवड्यांपुरती घरी परतली होती. त्यापाठोपाठ सुरू झालेल्या कोरोना कालखंडाने तिला कुटुंबापासून अधिकच दूर केले असेल का? आपल्या आईला आणि नंतर वडिलांनाही तिने आफताबकडून मारहाण होत असल्याची कल्पना दिली होती असे उल्लेख काही ठिकाणी दिसतात. लिव्ह इनचा आधुनिक पर्याय निवडणारी श्रद्धा नात्यात हिंसाचार आल्यानंतरही त्याच्याकडे लग्नाचा आग्रह का करत असावी? पुन्हा मुंबईला परतून जाण्याची नामुष्की अवमानकारक वाटल्याने ती त्याचे अत्याचार सोसत राहिली का? म्हणजे राहणीमान आधुनिक असले तरी मानसिकता मागासच होती. दोघेही एकमेकांवर अप्रमाणिकपणाचा आरोप करीत होते, त्यातून त्यांची भांडणे होत होती असेही समोर आले आहे. म्हणजे पर्याय लिव्ह इनचा निवडला असला तरी परस्परांकडून अपेक्षा वैवाहिक बांधिलकीचीच होती. अनेक लिव्ह इन प्रकरणांत संबंध बिघडू लागतात ते याच वैचारिक गोंधळातून. तिची हत्या होण्यापूर्वी दोघेही वेगवेगळ्या हिल स्टेशनला भेट देऊन आले होते असाही उल्लेख आढळतो. ओटीटी मालिकेत शोभूत दिसावे असे जगताना दोघांनी किमान आपापल्या कुटुंबांशी थोडाफार संबंध टिकवून ठेवला असता तर कदाचित् श्रद्धाच्या वाट्याला असा अमानुष शेवट आला नसता. त्यांच्या कहाणीतील वास्तव तपासातून आणखी उघड होईलच, परंतु जेवढे काही समोर आले आहे, त्यातील आफताबच्या क्रौर्यामागील मानसिकतेची मीमांसा करणे मात्र मानसशास्त्रज्ञांनाही कठीण जाईल, असे वाटते.**

# गिरे तो भी, टांग उपर!




**खबरबात**
**नितीन देशमुख**

पनवेल अर्बन बँकेची निवडणूक जाहीर झाली आणि कर्नाळा नागरी सहकारी बँक बुडवणारे पुन्हा गुडघ्याला बाशिंग बांधून तयार झाले. त्यासाठी पनवेलमधील महाआघाडीचे नेतेही त्यांना मदत करण्यासाठी सरसावलेले दिसत आहेत. कर्नाळा नागरी सहकारी बँकेत शेकापच्या नेत्यांनी सहकारापेक्षा स्वाहाकाराला महत्त्व दिले. यामुळे अनेकांचे प्राण गेले, अनेक कुटुंबे देशोधडीला लागली. ग्रामपंचायतींचे खातेही या बँकेत असल्याने या गावातील मूलभूत समस्या सोडवणे आज शक्य होत नाही. त्याचे दूरगामी परिणाम भोगावे लागणार आहेत, असे असतानाही 'गिरे तो भी टांग उपर' या पद्धतीने ते पनवेल अर्बन बँकेच्या भागधारकांकडे मते मागत आहेत.

'एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ' हा संत तुकारामांचा संदेश आणि सहकाराचे ब्रीदवाक्य असलेले 'विनासहकार, नाही उद्धार' या दोन्हीत एकच साम्य आहे, ते म्हणजे सहकार-सेवाभाव, मात्र आज मागे वळून पाहिले तर हा सेवाभाव कमी झालाय. काही अपवाद वगळता सहकाराच्या नावाखाली स्वाहाकारच वाढलाय. सहकारात राजकारण आले. सत्तेत स्पर्धा चढाओढ सुरू झाली. सत्ता आणि पैशाभोवती सहकाराचे राजकारण फिरू लागले आहे. सत्तेतून पैसा, पैशातून सत्ता हे राजकारणातले सूत्र सरकारात आल्याने ही स्पर्धा वाढत गेली. रायगड जिल्हा ही त्याला अपवाद नाही. पश्चिम महाराष्ट्रात वसंतदादा, राजाराम बापू यांच्यासारख्या नेत्यांनी सहकार चळवळ उभी करून त्यातून नेतृत्व उभे करून राज्याचे नेतृत्व केले. कोकणात मात्र सहकार रूजला नाही हे कटू सत्य आहे.

रायगड जिल्ह्यात १० वर्षांत गोरेगाव अर्बन, रोहा अर्बन, पेण अर्बन या बँकांसह अनेक पतसंस्था बुडाल्या आहेत. त्यामध्ये आता कर्नाळा बँकेची भर पडली. या बँका बुडण्यामागची कारणे पाहिली तर सारखीच असल्याचे दिसून येते. या बँकेच्या संचालकांनी नातेवाईकांना, कार्यकर्त्यांना आणि काही वेळा पैसे घेऊन कर्जे दिली. अनेक प्रकरणात कोणतीही कागदपत्रे पूर्ण न करता कर्ज दिली गेली. त्यामुळे कर्ज घेणारे किवा त्यांच्या जामिनदारांचा पत्ताच लागला नाही. अनेक कर्जे ही राजकीय नेत्यांनी आपल्या नोकरांच्या नावे घेतली होती. त्यांची वसुली करणे शक्य न झाल्याने या बँका बुडल्या. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. त्यांचे शापही या संचालकांना याच जन्मी भोगावे लागलेले पहायला मिळाले. गोरेगाव बँक अध्यक्ष आपल्या ब्लॉकमध्ये मरून पडल्याचे तीन-चार दिवस कोणाला समजलेच नाही. इतर बँकेच्या अध्यक्षांनाही यातना भोगाव्याच लागल्या.

रायगड जिल्ह्यातील ही उदाहरणे समोर असतांनाही कर्नाळा बँकेच्या संचालकांनी यापासून कोणताही धडा न घेता बोगस प्रकरणे करून शेकडो कोटीचे कर्जे लंपास केली. त्यानंतर लोकांना पैसे परत देण्याची आश्वासने देऊन विधानसभा निवडणूक लढवली. ज्या ठेवीदारांना घरातील कोणाच्या वैद्यकीय उपचारांसाठी किंवा मुलीच्या लग्नासाठी पैसे हवे असतील त्यांना एनएफटी करा पैसे मिळतील, अशी आश्वासने दिली. त्यापैकी कोणालाही पैसे परत दिले नाहीत. कामोठ्यामधील एका ठेवीदाराने आपला अनुभव सांगितला की, वडिलांच्या ऑपरेशनसाठी लागणारे पैसे आणून बँकेत ठेवले. उद्या ऑपरेशन करायचे म्हणून पैसे काढायला गेलो तर पैसे दिले नाही. विवेक पाटील यांना भेटल्यावर त्यांनी, 'एनएफटी करा, तुम्हाला पैसे मिळतील' सांगितले, पण माझ्या आधीच नऊशेपेक्षा जास्त जण प्रतीक्षेत असल्याचे दिसून आले. आता काय करायचे? असा प्रश्न पडला असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्राहक, ठेवीदार, खातेदारांच्या काबाडकष्टाच्या पैशासोबत ग्रामीण भागाच्या विकासासाठी असलेल्या पनवेल आणि उरण तालुक्यातील ग्रामपंचायतीचा कोट्यवधी रुपयांचा निधी शेकापच्या सरपंचांनी कर्नाळा बँकेत ठेवल्याने ग्रामविकासाला ही खीळ पडली आहे. ठेकेदारांना पैसे न मिळाल्याने अनेक प्रकल्प बंद पडणार आहेत. त्यामुळे अनेक गावांच्या पाण्याच्या योजना, रस्ते आणि गटारे यासारख्या मूलभूत सुविधापासून ही गावे वंचित रहाणार आहेत. त्याचे परिणाम अनेक वर्षे भोगावे लागणार आहेत.

एका वृद्ध मातेने आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, दहा वर्षांपूर्वी माझ्या मुलीचे आणि जावयाचे निधन झाले. त्यांचा मुलगा व माझा नातू लहान आहे. त्यांच्या संगोपनासाठी व पुढील भविष्यासाठी एक एक रुपया जोडून कर्नाळा बँकेत साडेतीन लाख रुपये जमा केले. लोकांच्या घरात धुणी-भांडी करून उदरनिर्वाह करीत आहे. एवढे कष्ट करीत असताना आयुष्याची पुंजी मला बँकेकडून मिळत नाही, बँक माझी व्यथा का समजून घेत नाही. मला माझे पैसे बँकेने द्यावेत, अशा शब्दात त्यांनी पाणावलेल्या डोळ्यांनी आपली भावना व्यक्त केली. पनवेलमध्ये एका इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या दुकानात काम करणारे प्रदीप पाटील एका कर्जदाराला जामिनदार असल्याचे व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून समोर आल्यावर प्रदीप पाटील यांना जोरदार झटकाच बसला. या संदर्भात त्यांनी सांगितले की, माझी आर्थिक परिस्थिती विचारात घेत कर्नाळा बँकेने दिड लाखांचे कर्ज मला दिले नाही, मात्र दहा कोटी रुपयांच्या कर्जाला मला जामिनदार म्हणून कसे केले? असा प्रश्न मला व्हॉट्सअॅपला आलेल्या मॅसेजवरून पडला आहे. विशेष म्हणजे ज्या व्यक्तीच्या नावाने कर्ज आहे, त्याला मी ओळखतसुद्धा नाही. त्यामुळे या बोगस कर्जाला मी कसा जामिनदार? असा सवालही त्यांनी बँकेला केला आहे.

कर्नाळा नागरी सहकारी बँकेत मात्र घोटाळा झाल्यापासून ठेवीदार, खातेदारांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महेश बालदी यांनी कर्नाळा बँक ठेवीदार संघर्ष समिती स्थापून ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी लढा सुरू केला. लढ्याच्या पहिल्या दिवसापासून माजी खासदार किरीट सोमैय्या यांच्या मार्गदशनाखाली लढाई सुरू झाली. घोटाळ्याचे आरबीआयला पत्र त्याचा पाठपुरावा, रिझर्व्ह बँकेवर मोर्चा, बँकेवर मोर्चा, सीआयडी, पोलीस आयुक्त, सहकार, ईडी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यावेळी अनेकांना बँकेत घोटाळा झाल्याचे मान्य नव्हते. विवेक पाटील यांनी तर छातीठोकपणे घोटाळा झालाच नाही, मी पैसे खाल्ले असेल तर स्वतःला जाळून घेईन, असे सांगितले होते. राज्यातील राज्यकर्त्यांच्या पाठिंब्यामुळे आपल्याला काहीच होणार नाही, या भ्रमात असलेल्या विवेक पाटील यांच्यावर अखेर ईडीने कारवाई करून त्यांना अटक केली. नंतर त्यांची २३४ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली.

केंद्र सरकारने नवीन कायदा मंजूर केला. रिझर्व्ह बँकेने आता कर्नाळा बँकेचा व्यवसाय परवाना 'बँकिंग बिझनेस इन इंडिया अंडर रेग्युरेशन २२ सेक्शन ५६, रेग्युरेशन अॅक्ट १९४९'नुसार रद्द करीत असल्याची अधिसूचना जारी केली. केंद्र सरकारने केलेल्या नवीन कायद्यामुळे कर्नाळा बँकेत पाच लाखांपर्यंतच्या ठेवींना रिझर्व्ह बँक ठेवी विमा संरक्षण व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनच्या नव्या नियमानुसार ठेवीदारांना परत मिळाल्या. पाच लाखांपेक्षा कमी रकमेचे ४९ हजार ४२३ ठेवीदार होते. त्यांचे एकूण २४० कोटी रुपये आहेत. ते केंद्र सरकारच्या निर्णयांनुसार विमा संरक्षणाच्या माध्यमातून परत मिळाले. या वेळी ही शेकाप लोकांचे पैसे परत देतोय असा संदेश शेकापकडून प्रसारित केला जात होता. पाच लाखांपेक्षा जास्त रक्कम असलेले २,२५१ ठेवीदार असून त्यांची २९४ कोटी रुपयांची ठेव आहे. ती मिळणे आज तरी अवघड असल्याचे दिसत आहे.

आज अनेक बँकांच्या ठेवी वाढत आहेत, मात्र अनेक नावाजलेल्या बँकांनी विश्वासार्हता गमावली आहे. समाजाने ज्यांच्यावर विश्वास टाकला त्यांनीच फसवणूक केली. कष्टकरी लोकांच्या घामाचा पैसा भविष्यातील ठेव म्हणून विश्वासाने ठेवला. धुण्या-भांड्याची कामे करून, म्हातारपणाचा विचार करून ठेवी ठेवल्या होत्या, मात्र ठेवींचे पैसे नात्यागोत्यात वाटून घेण्यात आले. दरोडेखोर रात्री दरोडा टाकतात. येथे दिवसा ढवळ्या दरोडे पडले. त्यामुळे पनवेल अर्बन बँक निवडणुकीत भागधारकांनी आता त्यांची जबाबदारी पार पाडावी आणि कर्तव्य ओळखावे. आमिषाने मत देऊ नये.



## बदलते तंत्रज्ञान



# फोन ऑफ झाल्यावरही मिळणार लाइव्ह लोकेशन

अँड्रॉईड फोन चोरीला गेल्यावर तो परत मिळेल याची अपेक्षाच आपण सोडून देतो कारण चोरी करणारा व्यक्ती फोन चोरल्यावर लगेचच स्वीच ऑफ करतो. त्यामुळे तो सापडत नाही. तुमचाही फोन हरवला असेल तर आधी पोलिसात तक्रार करावी लागते. पुन्हा कागदपत्रे आणि पोलिस स्टेशनच्या फेऱ्या माराव्या लागतात, मात्र फोन शोधण्यासाठी तुम्हाला गुगलचेच फीचर फाइंड माय फोनची मदत घेऊ शकता. हे एक थर्ड पार्टी अॅप असून याच्या मदतीने स्वीच ऑफ केल्यानंतरही फोन ट्रॅक करता येतो.



स्मार्टफोनचा वापर करणाऱ्यांची संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. स्मार्टफोनशिवाय आपली अनेक कामे थांबतात. स्मार्टफोन हरवला की समस्या येते, पण चोरीला गेलेला फोन तुम्ही सहजपणे ट्रॅक करू शकता. फोन स्वीच ऑफ केल्यानंतर त्याचा माग काढण्यात खूप अडचणी येतात, पण तुम्ही फोन बंद केल्यानंतरही तो ट्रॅक करता येतो. यासाठी तुम्हाला अँड्रॉइड अॅपची मदत घ्यावी लागेल.

अनेक केसेसमध्ये पोलिस फोन ट्रॅक करून योग्य व्यक्तीकडे सोपवतात, पण या प्रक्रीयेला वेळ लागतो. त्यामूळे सुरक्षा काही टिप्स वापरून तुम्ही तुमचा स्वत:च शोधून काढू शकता. यासाठी अनेक अॅप्स सहज उपलब्ध होतील.

गुगलवर ट्रॅक इट इव्हन इफ इट इज ऑफ हे अॅप उपलब्ध आहेत. अँड्रॉईड युजर्स ते गुगल प्ले स्टोअरवरून डाउनलोड करू शकतात. हे हॅमर सिक्युरिटीला सपोर्ट करते. ते वापरायलाही अधिक सोपे असते.

अॅप डाउनलोड केल्यानंतर, ते ओपन करण्यासाठी सेटींगमध्ये जाऊन परमिशन घ्यावी लागते. यात डमी स्विच ऑफ आणि फ्लाइट मोडची सुविधादेखील आहे. यामुळे फोन स्वीच ऑफ केल्यानंतरही तो पूर्णपणे स्वीच ऑफ होत नाही. तर चोराला फोन बंद झाल्याचे जाणवते. हे अॅप चोरी झालेल्या फोनचे लोकेशन, सेल्फी आणि ज्या व्यक्तीच्या हातात फोन आहे त्याचे इतर डिटेल्सही तूम्हाला इमरजेंसी नंबरवर पाठवते. हे अॅप फोनचे लाईव्ह लोकेशनही पाठवत राहते. हे ट्रॅक करणे खूप सोपे करते.

तुम्हीही अँड्रॉइड फोन वापरत असाल तर हे तुमच्यासाठी खूप युजफूल अॅप आहे. गुगल प्ले स्टोअरवरही याला चांगले रेटिंग देण्यात आले आहे. फोन चोरीला गेल्यास हे तुम्हाला खूप मदत करेल.

# आंतरराष्ट्रीय सहनशीलता दिन

**निमित्त**



१६ नोव्हेंबर १९९५पासून आंतरराष्ट्रीय सहनशीलता दिवस साजरा करण्यात येतो. मानवी मूलभूत हक्कांची जोपासना करीत असताना मानवतेची अस्मिता जपताना, मानवी मूल्यांची कदर करीत आपल्या पुढच्या पिढीला युद्धाच्या अरिष्टापासून वाचविण्यासाठी असहनशीलतेचा अंत व्हावा या उद्देशाने युनेस्कोने या दिवसाची घोषणा केली होती. मानवी बुद्धिमत्ता आणि एकजूट यांचा वापर करून पृथ्वीवर सर्वत्र शांती पसरावी यासाठी राष्ट्रकूल सतत प्रयत्नशील असते.

१९९६मध्ये, यूएन जनरल असेंब्लीने (यूएनजीए) ५१/९५ हा ठराव मंजूर केला आणि १६ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय सहिष्णुता दिन म्हणून नियुक्त केले. यूएनजीएने यूएन सदस्य देशांना सहनशीलता आंतरराष्ट्रीय दिन साजरा करण्यासाठी आमंत्रित केले. १९९३ मध्ये युएनजीएने संयुक्त राष्ट्रसंघाचे सहिष्णुतेचे वर्ष १९९५ म्हणून घोषित केले. त्यानंतर युनेस्कोच्या पुढाकाराने, सहिष्णुतेच्या तत्त्वांच्या घोषणेचा स्वीकार केला आणि वर्षाची कृतीची पाठपुरावा योजना राबविली.

आजचे जग दहशतवाद, जातीयवाद, हिंसा, प्रांतीयवाद, तीव्र राष्ट्रीयता, मूलतत्त्ववाद आदींमुळे अस्वस्थ आहे. त्यासाठी राष्ट्रकुल आपल्या सदस्य राष्ट्रांना आवाहन करते की जात, धर्म, भाषा, लिंग, राष्ट्र असे भेदभाव बाजूला सारून सकलांनी मानवतेच्या उद्धारार्थ सहनशीलतेची कास धरली पाहिजे. सहनशीलता हाही एक सद्गुण आहे व त्यामुळे सर्वत्र शांती नांदते इतकेच नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक प्रगतीस हातभार लागतो. त्यासाठी राज्यपातळीवरील कायद्याने सर्व नागरिकांना समान हक्क दिले पाहिजेत. समाजातील विविध गटात मतभेद होऊ शकतात, पण ते मिटविण्यासाठी समर्थ यंत्रणादेखील कार्यरत असायला हवी. सहनशीलतेचा प्रसार होण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. नागरिकांची बांधिलकी या चळवळीसाठी आवश्यक आहे. आजचा दिवस याच संदेशासाठी प्रायोजित केला आहे.

मतभिन्नता किंवा दुसऱ्याची मते लादून घेणे म्हणजे सहनशीलता नव्हे, तर परस्परावरील आदराने आणि एकमेकांशी समझौता करून जगण्याचा तो एक मार्ग आहे. जागतिक पातळीवरील विविधतेला न घाबरता तिचा अंगीकार करणे हाच तर सहनशीलतेचा पाया ठरतो. २००५ सालच्या विश्व परिषदेत या घोषणेचा पुनरूच्चार होऊन, राष्ट्रीय नेत्यांनी आणि त्यांच्या सरकारांनी सहनशीलतेला उत्तेजन देऊन वेगवेगळ्या समाजगटात, संस्कृती विभागात तसेच लोकांमध्ये संवाद घडवून आणला पाहिजे आणि त्यांच्यात परस्पर सहकार्याची भावना रूजवून प्रगतीच्या दिशेने नेण्यास प्रयास केले पाहिजेत. यावर भर देण्यात आला.

या दिवशी इंडियन मेडिकल असोसिएशनशी संबंधित वरिष्ठ डॉ. एमसी शर्मा यांचे म्हणणे आहे की खाणे आणि अनियमित दिनचर्या बिघडल्यामुळे तणाव वाढत आहे. अशा परिस्थितीत त्यांचे सहनशीलता कमी होत आहे आणि यामुळे रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह यांसारख्या गंभीर आजारांमुळेसुद्धा त्यांना धोका आहे. वाढती रूग्ण आणि घटना याचा पुरावा आहेत. नशादेखील बऱ्याच घटनांसाठी जबाबदार असते.

ही समस्या टाळण्यासाठी केवळ शरीरच नाही तर आपले मनही बळकट करावे लागेल. या आंतरराष्ट्रीय सहनशीलता दिनी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांना सहनशील बनवण्याची प्रतिज्ञा घ्यावी. आपल्या मुलांना या समस्येपासून वाचवायचे असेल तर सर्व प्रथम आपला मानसिक ताण कमी करा. त्यांच्याशी प्रेमाने बोला आणि त्यांना चांगल्या आणि वाईट गोष्टींचे ज्ञान द्या, त्यांना लहानपणापासूनच दयाळूपणे आणि सहनशीलतेचे धडे देणे आवश्यक आहे.

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : सध्या सायंकाळच्या वेळी वातावरणात गारवा जाणवत आहे. अशाच एका रम्य सायंकाळी समुद्रकिनारी घोडागाडीतून रपेट मारण्याची मजा काही औरच! हा आनंद घेण्यासाठी पर्यटक कायमच अलिबागला येत असतात.**



## आरोग्य प्रहर

# 'या' उपायांनी मिळवा कंबरदुखीपासून आराम

कंबरेत वेदना होण्याचा त्रास अनेकांना होतो. खूप वेळ एकाच स्थिती बसल्याने, वाकडे झोपल्याने किंवा थकवा येण्याने कंबर दुखी होऊ शकते, परंतु शरीरात पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे देखील कंबरेत वेदना होऊ शकते. जीवनसत्व ब १२चा अभाव वेदना होण्याचे कारण ठरू शकते. जीवनसत्व ब १२ रक्तपेशींना निरोगी ठेवण्याबरोबरच शरीरातील उर्जा राखते. या जीवनसत्वाच्या कमतरतेमुळे लवकर थकवा येतो आणि शरीरातील अनेक भागांत विशेषकरून कंबरेत वेदना होऊ लागतात. म्हणून शरीराला आवश्यक प्रमाणात जीवनसत्व ब मिळणे गरजेचे आहे. कंबरेची वेदना दूर करण्यासाठी तुम्ही पुढील उपाय करू शकता.



**१) जीवनसत्व ब १२ ची कमतरता भरून काढणे** : आहारामध्ये बदल करून तुम्ही जीवनसत्व ब १२ची कमतरता भरून काढू शकता. आहारात टुना मासे, दूध, दही, अंडी, चीज, केळी, स्ट्रॉबेरीचा समावेश करा. या पदार्थांमधून तुम्हाला जीवनसत्व ब १२ मिळेल.

**२) हळदीच्या दुधाचे सेवन** : हळदीच्या दुधाचे सेवन केल्याने कंबरेची वेदना कमी होण्यास मदत होऊ शकते. हळदीमधील अँटिइन्फ्लेमेटोरी आणि अँटिऑक्सिडेंट गुण हाडांच्या वेदनांपासून सुटका देण्यात मदत करू शकतात. एक ग्लास दुधात अर्धा चमचा हळद टाकून प्या. याने कंबरेच्या वेदनेपासून आराम मिळू शकते.

**३) हर्बल टी** : आले आणि ग्रीन टी मिसळून बनवण्यात आलेली हर्बल टी कंबरदुखीपासून आराम देऊ शकते. यासाठी ग्रीन टी बनवताना त्यात आल्याचे लहान तुकडे टाका आणि शिजवा. अँटिइन्फ्लेमेटोरी गुणांनीयुक्त हा चहा कंबरीची वेदना कमी करण्यात मदत करेल.

**४) गरम पाणी** : कंबरेची वेदना घालवण्यसाठी गरम पाणी उपयुक्त ठरू शकते. गरम पाण्याने आंघोळ किंवा बाथटबमध्ये गरम पाणी टाकून त्यात काही वेळ बसल्याने वेदनेपासून सुटका मिळू शकते. तुम्ही कंबरेला गरम पाण्याचा शेक देऊ शकता, मात्र पाण्याचे तापमान खूप जास्त नसावे, अन्यथा त्वचा जळू शकते.

**५) व्यायाम** : बसण्याच्या आणि झोपण्याच्या स्थितीकडे लक्ष द्या. खांद्यांना सरळ ठेवून बसा आणि आवश्यकतेपेक्षा अधिक झुकू नका. यासह व्यायाम करा, तसेच दीर्घकाळ उभे किंवा बसून राहण्याचे टाळा.

# रसायनयुक्त सांडपाणी वाहिनी फुटली

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीमधून रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाइपलाइन वडवली गावाजवळ सोमवारी (दि. १४) सायंकाळी सातच्या सुमारास फुटली. त्यामुळे परिसरातील अनेक शेतांमध्ये रसायनयुक्त सांडपाणी गेल्याने शेतकरी आक्रमक झाले. शिरगाव ग्रामस्थांनी यावेळी महाड औद्योगिक विकास महामंडळाच्या कारभारावर संताप व्यक्त केला.

महाड औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यांचे सांडपाणी सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया करून पाइपलाइनद्वारे खाडीत सोडले जाते. ही पाइपलाइन राजेवाडी, वडवली, कोल, शिरगावमार्गे खाडीपट्ट्यात जाते. या पुर्वी अनेकवेळा ही पाइपलाइन फुटून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे. सोमवारी संध्याकाळी शिरगाव आणि वडवली गावांच्याजवळ ही पाइपलाइन पुन्हा फुटली. हजारो लिटर रासानिक सांडपाणी परिसरातील अनेक शेतांत पसरले. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले अ ाहे. रासायनिक सांडपाण्यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. सुमारे तीन तास हे सांडपाणी वाहत असतानादेखील एमआयडीसीचे कोणताही कर्मचारी घटनास्थळी लवकर पोहोचले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. संपूर्ण शिरगाव गाव या वेळी रस्त्याला आले होते.

रासायनिक सांडपाणी वाहून नेणारी पाइपलाइन फुटण्याची ही पहिलीच घटना नसून यापूर्वीदेखील अनेक वेळा ही रासायनिक सांडपाणी वाहिनी फुटण्याच्या घटना घडल्या आहेत, मात्र त्याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व एमआयडीसीचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप या वेळी ग्रामस्थांनी केला.

## शिरगाव ग्रामस्थ आक्रमक



# बोरघाटात ट्रक उलटून एकाचा मृत्यू



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई –पुणे द्रुतगती मार्गावर मंगळवारी (दि. १५) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास मालाने भरलेला भरधाव ट्रक अनियंत्रित होऊन उलटला. या अपघातात ट्रकमधील एकजण ट्रकखाली चेपला जाऊन त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. महामार्गावरील यंत्रणांनी तातडीने मदतकार्य करून उलटलेला ट्रक बाजूला केल्यावर मुंबई बाजूकडील वाहतूक सुरळीत झाली.

भरधाव वेगातील ट्रक अनियंत्रित होऊन मंगळवारी दुपारी बोरघाटातील अमृतांजन पुलाच्या खाली उलटला. या अपघातात ट्रकमधील एकजण ट्रकखाली चेपला. त्याचा जागीच मृत्यू झाला. आपत्कालीन यंत्रणांनी ट्रकमधील अन्य दोन जखमींना तातडीने लोकमान्य रुग्णालयात उपचारासाठी नेल्याचे वाहतूक पोलिसांनी सांगितले. दरम्यान या ट्रकमध्ये कोळंबी होती, ट्रक उलटण्याने ती सर्व रस्त्यावर पसरली होती. उलटलेला ट्रक बाजूला केल्यानंतर मुंबई बाजूकडील वाहतूक सुरळीत झाली.

# महाडमध्ये किशोरवयीन मुलांसाठी जीवनकौशल्य कार्यक्रम



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

युवा मित्र संस्थेच्या वतीने महाड शहरातील १८ माध्यमिक शाळांमधील किशोरवयीन मुलांसाठी जीवनकौशल्य कार्यक्रम राबविला जात आहे. बालदिनाचे औचित्य साधून सोमवारी (दि. १४) कोंझर येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयात जीवनकौशल्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कोंझर येथील जिजामाता माध्यमिक विद्यालयात युवा मित्र संस्थेच्या माध्यमांतून पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतनिमित्त बालदिन साजरा करण्यात आला. या वेळी बालदिनाचे महत्त्व अनन्य साधारण कसे आहे, हे सांगून किशोर राक्षे, जितेंद्र शिगवण यांनी उपस्थित मुलांना पं. जवाहरलाल नेहरू याच्याबद्दल सविस्तर माहिती दिली. या वेळी युवा मित्र संस्थेने मुलांना खाऊचे वाटप केले. शाळेचे मुख्याध्यापक कुलकर्णी, सुमित मोरे यांच्यासह युवा मित्र संस्थेचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# कर्जतमधील श्वानांचे मोफत लसीकरण

**कर्जत : प्रतिनिधी**

पीपल फॉर निमल आणि कर्जत ॲनिमल लवर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत नगरपालिका हद्दीत पाळीव व भटक्या कुत्र्यांचे मोफत लसीकरण आयोजित करण्यात आले होते. त्यांना मुलुंड-मुंबईच्या उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनने सहकार्य केले. या मोहिमेत एकूण १८० कुत्र्यांचे मोफत लसीकरण करण्यात आले.



नगरसेविका संचिता पाटील यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. नगरसेवक संकेत भासे, माजी नगरसेवक संतोष पाटील तसेच चेस्टन डिसूजा, राज गोडबोले, पवन गुप्ता, रोहन काळे, शिवांश मिश्रा, अमोघ काळे आदी या वेळी उपस्थित होते. या लसीकरणाची सुरुवात मुद्रे विभागातून करण्यात आली. दहिवली सुयोगनगर येथे या लसीकरण मोहिमेचा समारोप झाला.

# पायी दिंडी निघाली आळंदीला

## बैलगाडीत ज्ञानेश्वर माऊली, तुकोबांची मूर्ती

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्याच्या अनेक गावांतून अनेक वारकरी पायी दिंडीने आळंदीला जातात. या पायी दिंडीमध्ये सजविलेल्या बैलगाडीत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज आदींसह या पालखीचे प्रस्थान आळंदीकडे झाले.

कर्जत तालुक्यातील दहीगाव येथील आदिनाथ माऊली पायी दिंडीच्या वतीने हभप भरत महाराज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. दिंडी निघण्याच्या पूर्व संध्येला हभप रघुनाथ महाराज सावंत यांचे कीर्तन झाले. त्यानंतर मंगळवारी (दि. १५) सकाळी देहू ठाकरे, रवींद्र मांडे, वसंत देशमुख, हरिभाऊ कोळंबे आदींच्या नेतृत्वाखाली सजविलेल्या बैलगाडीत विठ्ठल-रखुमाई, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज आदींच्या मूर्ती घेऊन दिंडी आळंदीकडे मार्गस्थ झाली. सहा ठिकाणी मुक्काम करून ही पायी दिंडी आळंदीला पोहोचेल. या दरम्यान प्रत्येक रात्री हरी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.



(छाया : विजय मांडे)

# पेणमध्ये जलसंवाद यात्रेचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

नद्या स्वच्छ, सुंदर, निर्मळ अमृतवाहिनी राहण्यासाठी पेणमध्ये गेली अनेक वर्षे समाजप्रबोधनाचे काम सुरू आहे. याच अनुषंगाने समाज प्रबोधन मंच या संस्थेतर्फे पेणमध्ये भोगावती नदी जलसंवाद यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. ही जलसंवाद यात्रा गावोगावी जाऊन लोकांशी संवाद साधणार आहे.



(छाया : अनिस मनियार)


समाज प्रबोधन मंच या संस्थेतर्फे 'नदी संवर्धन काळाची गरज' या विषयावर तालुकास्तरीय निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धांही घेण्यात आली. त्यात ७२ स्पर्धकांनी भाग घेतला होता. परीक्षक म्हणून श्रीकांत म्हात्रे, निता सावंत यांनी काम पाहिले.

या वेळी मंचाचे अध्यक्ष ए. बी. पाटील, कार्याध्यक्ष रुपेश कदम, सेक्रेटरी मनोज पाटील, एच. एम. पाटील, रवींद्र पाटील, बळी दादा, उदय मानकवळे यांच्यासह विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये जलकलशाचे पूजन करून जलसंवाद यात्रेचा शुभारंभ झाला. हे जलकलश पेण तालुक्यातील अनेक गावांमध्ये फिरवण्यात येणार आहेत. तसेच घरोघरी नदी स्वच्छतेबद्दल माहिती पत्रक वाटून समाजामध्ये प्रबोधन करण्यात येणार आहे.

# वॉटर टॅक्सीमधून २४०० प्रवाशांची सफर

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुंबई-मांडवा वॉटर टॅक्सीसेवा सुरू होऊन दोन आठवडे पूर्ण झाले असून या दोन आठवड्यांत दोन ४०३ प्रवाशांनी या वॉटर टॅक्सीतून प्रवास केला आहे. भविष्यात या सेवेत वाढ होणार आहे.



नयनतारा शिपिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची २०० प्रवाशी क्षमतेची वॉटर टॅक्सी १ नोव्हेंबरपासून मुंबई डोमेस्टिक क्रूझ टर्मिनल-मांडवा अशी धावू लागली आहे. या सेवेमुळे मुंबईहून मांडव्याला केवळ ४० ते ४५ मिनिटांत पोहचणे शक्य झाले आहे. देशातील सर्वांत मोठ्या वॉटर टॅक्सीतून मुंबईकरांना प्रवास करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्यानुसार आतापर्यंत दोन आठवड्यात या वॉटर टॅक्सीतून २,४०३ प्रवाशांनी प्रवास केल्याची माहिती कंपनीने दिली.


**उरण नगरपरिषद, उरण**

ता. उरण, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०० ७०२

दूरध्वनी क्रमांक: २७२२२३२०

Email ID : urancouncil@rediffmail.com, uranmunicipal@gmail.com

जा.क्र.: उनप/आरोग्य /२७८८/२०२२-२०२३ दिनांक :- १५/११/२०२२

राज्यातील स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ करीता उरण नगरपरिषदेमध्ये शहर समन्वयक (City Co-ordinator) ची निव्वळ कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याकरीता खालील पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| पदनाम | पदची संख्या | शैक्षणीक आर्हता | अर्ज कोणाकडे करावा | अनुभव | ठोक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-ordinator) | ०१ | मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणतीही पदवी १) बी.ई (कोणतीही निगडीत शाखा) २) बी.टेक (कोणतीही शाखा) ३) बी. आर्क ४) बी. प्लॅनिंग | मुख्याधिकारी उरण नगरपरिषद उरण | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. | रक्कम रु. ४५,०००/- प्रती माह |

**(अ) अपेक्षित कामाचे स्वरुप :**

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत उमेदवाराने खालील विषयांची अनुषंगीक कामे करणे अपेक्षित आहे :

१) स्वच्छ सर्वेक्षण २०२३ शी संबंधित अनुषंगीक कामे :
२) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, अनुषंगीक कामे
३) हागणदारी मुक्त शहरांसंबंधीची कामे ( ODF,ODF+/++, Water +, GFC,SS) संबंधित अनुषंगीक कामे.
४) शहराला तारांकीत मानांकन मिळविण्याच्या दृष्टिने करावी लागणारी अनुषंगीक कामे
५) मुख्याधिकारी यांनी नेमून दिलेली स्वच्छ सर्वेक्षण संबंधीत अनुषंगीक कामे.
६) वरीष्ठ कार्यालयाशी समन्वय साधणे.
७) स्वच्छ सर्वेक्षण टूलकीटनुसार कामे करण्यास नगरपरिषदेस सहकार्य करणे.
८) मासिक MIS (एम.आय.एस.) भरणे.
९) स्वच्छ सर्वेक्षणाशी निगडीत इतर अनुषंगीक कामे.

**(ब) उमेदवारांसाठी सूचना :**

कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक पदाच्या (City Co-ordinator) नियुक्तीसाठी खालील प्रमाणे प्रक्रियेचा अवलंब करण्यात येईल.

१. स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर शहर समन्वयक पदासाठी जाहिरात प्रसिध्दी अल्प कालावधीत (७ दिवसांची मर्यादित) करण्यात येईल.
२. या पदासाठी आवश्यक पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांना शहर स्तरावरील निवड प्रक्रियेस अर्ज करता येईल.
३. उमेदवारांनी सादर केलेल्या अर्जाची आवश्यक कागदपत्रांची पडताळणी स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावर करण्यात येईल.
४. पडताळणीस पात्र ठरणाऱ्या उमेदवारास शहर स्तरावरील मुलाखतीस उपस्थित राहण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था स्तरावरुन कळविण्यात येईल.
५. उमेदवाराची वयोमर्यादा ३५ वर्षे इतकी राहील. (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल.)

**(क) अटी व शर्ती : कंत्राटी**

१. कंत्राटी तत्वावरील सदर नियुक्ती स्वच्छ सर्वेक्षण -२०२३ अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ ची तपासणी पूर्ण होई पर्यंत राहील.
२. सदरची नियुक्ती कंत्राटी तत्वावर असून सदरची नियुक्ती ही नियुक्ती झालेच्या ११ महिन्यांपर्यंत राहील.
३. नियुक्ती कालावधी संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदत वाढ देण्यात येणार नाही.
४. कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या सदर कर्मचाऱ्यास शासकीय कायम शासकीय कर्मचाऱ्यास मिळणाऱ्या कोणत्याही सोई सुविधांचा लाभ मिळणार नाही/अनुज्ञेय असणार नाही.
५. सदरची नियुक्तीही पूर्णत: कंत्राटी मानधन तत्वावर आहे.
६. सदरचे मानधन हे संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत अदा करणेत येईल.
७. उमेदवाराचे वय दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी ३५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.
८. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्वच्छ सर्वेक्षण विषयक केलेल्या कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य असेल.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद उरण**



**Tender Notice**

Mahatma Phule Arts Science & Commerce College Panvel, District-Raigad invites tenders with materials from reputed contractors for Internal & External Painting Work of various Buildings in the Campus. Details are as follows

| Sr. No. | Work | Area in sqm | Earnest Money Deposit | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| 1 | Admin, Guest house Building | 1100.65 | 4600/- | 1000/- |
| 2 | Bio-tech Lab Building | 1759.88 | 7500/- | 1000/- |
| 3 | Library Building | 850.70 | 3500/- | 1000/- |
| 4 | Main Academy Building | 8232.00 | 40,000/- | 1000/- |
| 5 | I.T. Lab Building | 905.00 | 3500/- | 1000/- |
| 6 | Principal Building | 354.30 | 2000/- | 1000/- |
| 7 | Sports Complex | 1750.00 | 10,000/- | 1000/- |

The tender documents will be available at Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel from 17/11/2022 to 23/11/2022 between 10.00 a.m. to 5.00 p.m. Last date of Tender Submission is 26/11/2022 Date of Tender Opening will be informed to the respective Contractors.

Date : 15/11/2022

**Sd/-**
**Principal,**
Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **श्री. पदू नामा म्हात्रे** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - पालीदेवद, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.

| गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २५/३अ | ०-३५-०० | ३.६८ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १५/११/२०२२.

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल मो. क्र. : ९९३०३६९८६१



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मे. सिडकोमार्फत त्यांच्याकडील १२.५ टक्के योजनेअंतर्गत नवीन भुखंडधारक यांच्यापैकी मे. मेघा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स वतीने भागीदार (अ) श्री. कांजी अखई पटेल, (ब) श्री. लालजी मावजी बारवडिया, (क) श्री. लीरा रामजी अरेटिया यांचा कार्यालयीन पत्ता शॉप नं. १, प्राईम विला, सेक्टर ४८, द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड नवी मुंबई,. यांच्या लाभांत हस्तांतरीत करण्यात आलेल्या ५० टक्के क्षेत्राच्या भुखंडांचे त्यांच्याकडून मे. सिडकोमार्फत भुखंड हस्तांतरणासंदर्भातील पुर्वपरवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भुखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी नोड, ता. उरण, जि. रायगड | २० | ४७ | २४९.९० चौ. मी. पैकी १२४.९७ चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडांच्या संपूर्ण क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्राचे आमच्या अशिलांच्या लाभात हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण पुर्वपरवानगी स्विकारुन त्रिपक्षीय करारनामा निष्पादित व नोंदणी करुन घेण्याचे ठरविले आहे, सदर क्षेत्राच्या भुखंडांचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर क्षेत्राचा भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर सदर क्षेत्राच्या भुखंडांवर कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबध असल्यास लेखी पुराव्यानिशी अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेसा ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावे, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरच्या क्षेत्राचा भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशिल हे सदरहु क्षेत्राच्या भुखंडासंदर्भातील संपूर्ण व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

दिनांक : १५/११/२०२२

**सही/-**
**ॲड. धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**

पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे



**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**ज. व्य. विभाग, पनवेल**

**ई-निविदा सुचना क्र. ५९ सन २०२२-२३ (तिबार मागणी)**

वाढीव व सुधारित न्हावा-शेवा पाणी पुरवठा टप्पा-३, ता. पनवेल, जि. रायगड- वायाळ पंपिंग स्टेशन ते राष्ट्रीय महामार्ग क्र.४ लोधिवली या पर्यंतची २२ kv HT ओव्हरहेड लाईन स्थलांतरीत करणे, कार्यान्वित करणे व चाचणी देणे, ता. पनवेल, जि.रायगड या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू.०.६६ कोटी आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.२१/११/२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक : १०/११/२०२२

**सही/-**
**(व्ही.के.सुर्यवंशी)**
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग पनवेल

विमाका/कोवि/२०२२-२०२३/९६१

## निवडक

### पर्समधून सोन्याचे दागिने लांबवले

**पनवेल :** पर्समधून साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सेक्टर चार, कळंबोली येथील बंडोपंत सूर्यवंशी यांनी कोल्हापूरला जात असल्याने घरातील सोन्याचे साडेनऊ तोळे वजनाचे दागिने इर्टिगा गाडीतून नेले होते. ते कोल्हापूरला काही दिवस राहिले व त्यांची दोन मुले या कारने कळंबोलीला गेली. त्यानंतर बंडोपंत व त्यांची पत्नी दोघे सोबतचे साडेनऊ तोळे सोन्याचे दागिने घेऊन स्वामी ट्रॅव्हल्स गाडीने कोल्हापूरमधून कळंबोलीच्या घरी जाण्यासाठी निघाले. ते पहाटे कामोठे ब्रिजला उतरले. त्यानंतर काही वेळ घरी आराम केल्यानंतर त्यांनी पर्स तपासली असता त्यातून दागिने गायब झाले होते. त्यानंतर त्यांनी या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात कामोठे पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

### प्रभाकर मोकल यांना पुरस्कार



**पनवेल :** पेण तालुक्यातील कोपर गावचे सुपुत्र सध्या सु.ए.सो.पालीचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके, माध्यमिक विद्यालय शिरढोण, येथे कार्यरत असलेले सहाय्यक शिक्षक प्रभाकर पांडुरंग मोकल यांना सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबईतर्फे दिला जाणारा २०२२ चा पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी (दि. १२) शिवाजी नाट्यमंदिर, दादर (प.) मुंबई येथे झाला. मोकल यांना सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ व मानाची पगडी देऊन सन्मानित करण्यात आले आहे. मोकल यांनी केलेल्या कार्याची पावती म्हणून त्यांना यापूर्वीही अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या पुरस्कारमुळे त्यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### लोकशाही दिनी तीन अर्ज निकाली

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या तीन असून आलेल्या अर्जांची संख्या पाच असे एकूण प्राप्त अर्ज आठ होते. त्यापैकी तीन अर्ज निकाली काढण्यात आले. सध्या पाच तक्रारी प्रलंबित आहेत.

# बाल महोत्सवात स्वच्छतेचा जागर

## सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध स्पर्धांना विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



नवी मुंबई महापालिकेच्या वतीने बाल दिनाचे औचित्य साधून विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या स्वच्छ बाल महोत्सवाच्या वेळी सांस्कृतिक सादरीकरणातून स्वच्छतेचा जागर करण्यात आला. नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

बाल दिनानिमित्त आयोजित नृत्य, नाट्य, कीर्तन अशा विविध माध्यमातून स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराचे कौतुक करीत आयुक्तांनी पहिला नंबर विद्यार्थ्यांना किती अभिमानाचा व हवाहवासा वाटतो हे सांगितले. आपल्या शहराच्या देशातील नंबर वन यशासाठी यापुढील काळात प्रत्येक विद्यार्थ्याने आपला वर्ग, शाळा तसेच आपले घर, परिसर स्वच्छ राहील याची पुढाकार घेऊन जागरूकतेने काळजी घ्यावी, अशी जबाबदारी विद्यार्थ्यांवर आयुक्तांनी सोपविली. इंडियन स्वच्छता लीगच्या कार्यक्रमात ज्याप्रमाणे स्वच्छतेसाठी सर्व विद्यार्थी एकत्रित येऊन देशात पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थी सहभागाचा विक्रम प्रस्थापित केला, तीच परंपरा कायम राखत आपण सर्व मिळून स्वच्छ सर्वेक्षणातही देशात पहिल्या क्रमांकाचे ध्येय गाठण्यासाठी कटिबध्द होऊया, असे आवाहन आयुक्तांनी या वेळी केले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, शिक्षण विभागाचे उपआयुक्त योगेश कडुस्कर, आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त मंगला माळवे आदी उपस्थित होते.

झाडू, खराटा, कचरा डबा, हातमोजे अशा स्वच्छताविषयक साहित्याचा वापर करून करावयाच्या नृत्य स्पर्धेतील ३६ सहभागी स्पर्धकांतून अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या पाच शाळा समुहांचे नृत्य सादरीकरण या वेळी झाले. यामधून सुशिलादेवी देशमुख मराठी विद्यालय सेक्टर ४ ऐरोली या शाळेने सर्वप्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. विद्याभवन प्राथमिक शाळा नेरूळ ही शाळा द्वितीय तसेच नमुंमपा शाळा क्र. १११, तुर्भे स्टोअर ही शाळा तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. नमुंमपा शाळा क्र. ४६, गोठिवली आणि नमुंमपा शाळा क्र. २२ तुर्भे या शाळांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात आली. नृत्यदिग्दर्शक सुरज विश्वकर्मा आणि पुजा साहू यांनी नृत्य स्पर्धेचे परीक्षण केले.

बालमहोत्सवात सादर झालेल्या मनिष गजभर या विद्यार्थ्याने नमुंमपा शाळा क्र. ९२, कुकशेत येथील आपल्या विद्यार्थी सहकाऱ्यांसह सादर केलेले कीर्तन अत्यंत लक्षवेधी ठरले. स्वच्छता संदेशाचे अभंग, रचनांतून अत्यंत प्रभावी सादरीकरण करणाऱ्या कीर्तनकार विद्यार्थ्याचा आयुक्त महोदयांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

> **बाल दिनाचे औचित्य साधून राबविलेल्या 'नृत्य स्पर्धा' आणि 'रंगवूया आपला कचऱ्याचा डबा' या दोन्ही उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाल्याबद्दल समाधान वाटते. यापूर्वीही स्वच्छताविषयक दिंडी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांना अतिशय उत्तम प्रतिसाद देऊन स्वच्छतेविषयीची आपली जागरूकता विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने दाखवून दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन!**
> **-सुजाता ढोले, अतिरिक्त आयुक्त, नवी मुंबई मनपा**

## केबीपी कॉलेजमध्ये डायबेटिस तपासणी शिबिर

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये कॉमर्स विभाग व लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने १२ व १३ नोव्हेंबर रोजी डायबेटिस तपासणी शिबिर आयोजिण्यात आले होते.

आधुनिक जीवनशैली, बदलती आहारपद्धती, सोशल मीडियावरील व्यस्तता यामुळे आजच्या विद्यार्थ्यामध्ये कमी वयातच वेगवेगळ्या व्याधींनी शिरकाव केला आहे. म्हणूनच कॉमर्स विभागाने विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय शिबिर आयोजित केले. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना आपल्या शरीरातील साखरेचे प्रमाण किती आहे. तसेच त्यासंबंधी कोणती काळजी घ्यायला हवी या विषयी माहिती मिळाली. एकूण ३०० विद्यार्थी व शिक्षकांनी या शिबिराचा लाभ घेतला. बायोसिस्ट लॅब्रोटरीच्या टेक्निशियन जेनिफर सेलवर्य यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शुभदा नायक, उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, लायन्स क्लब प्रतिनिधी ए. के. साहा, डॉ. हर्षा गोयल, डॉ. विवेक भोईर, डॉ. केशव शिंदे, प्रा. सविता थापा यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर झाले.



## बाल दिनानिमित्त 'युईएस'मध्ये विविध स्पर्धा

**उरण : वार्ताहर**





पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून युईएस स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमधील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी विविधरंगी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी कविता वाचन, गायन व कथा सांगणे, चित्रकला, निबंध, फॅन्सी ड्रेस या स्पर्धा होत्या तर माध्यमिक विभागाच्या विदयार्थ्यांसाठी यूईएस गॉट टॅलेंट, फॅन्सी ड्रेस, कोलाज वर्क, कॅरिकेचर, क्विझ तर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी एक्सटेम्पोर, क्विझ, बेस्ट आऊट वेस्ट, रांगोळी, मेहंदी, फुलदाणी सजावट इत्यादी तर सोमवारी (दि. १४) झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य, गायन, लघु नाटिका, पोवाडा, इत्यादी विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सादर केले.

विद्यार्थ्यांनी या सर्व स्पर्धांमध्ये मोठ्या उत्साहाने सहभाग घेऊन स्पर्धा रंगतदार केली. म्हणूनच सर्व कमिटी मेंबर्स, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य सोनाली म्हात्रे, स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया आणि पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व प्रयत्नांना मनापासून दाद दिली व कौतुकही केले.

## नेरूळमधील उद्यानात रात्री चोरट्यांसह मद्यपींचा वावर

### नागरिक त्रस्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नेरूळ सेक्टर २ मधील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उद्यानात रात्रीच्या वेळेस चोरटे आणि मद्यपींचा मोठ्या प्रमाणावर वावर सुरू आहे. त्यामुळे या उद्यानात येणाऱ्या नागरिकांना व मुलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

धर्मवीर संभाजी महाराज उद्यान हे नेरूळ सेक्टर २ मध्ये एका कोपऱ्यात पश्चिम बाजूस आहे. नागरी वसाहतीपासून थोडे बाजूला असल्याने येथे सायंकाळी अंधार पडल्यावर गर्दुल्ले आणि मद्यपीचा वावर वाढतो. उद्यानात एकांत मिळण्यासाठी आलेले नागरिक तसेच उद्यानात फिरण्यासाठी आलेले महिला व मुलांना फिरणे मुश्कील होत आहे. परिणामी रात्रीच्या वेळेस उद्यानातून नागरिकांना निघून जावे लागते. येथील उद्यानाचा लोखंडी लहान गेट चोरट्यांनी गायब केला आहे तर लोखंडी कुंपण, लोखंडी खेळणी चोरांनी गायब केले आहेत. येथे सुरक्षा रक्षकांचा पत्ताच नसतो. त्यामुळे मद्यपी आणि गर्दुल्ले यांचा रासरोज वावर याठिकाणी आढळून येतो.

उद्यानात मोठ्या प्रमाणावर गवत वाढलेले आहे. ओपन जिम आणि खेळणी नादुरुस्त आहेत. उद्यानाचा बाजूला सार्वजनिक शौचालय असून यातील पाणी खासगी वाहन, रिक्षा धुण्यासाठी वापरत असल्याचे पहावयास मिळते. यासंदर्भात संबंधित विभागाने लक्ष घालून लवकरात लवकर हा गंभीर प्रश्न सोडवावा व येथील स्थानिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा, अशी मागणी केली जात आहे.

> **छत्रपती संभाजी महाराज उद्यानातील प्रवेशद्वार व अन्य सामुग्रीविषयी अभियांत्रिकी विभागास पत्रव्यवहार करून या बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत. नवीन खेळणी बसवण्याची प्रक्रिया सुरू आहे.**
> **-दीपक रोहेकर, उद्यान अधिकारी**



## तळोजा एमआयडीसीत पाण्याचा तुटवडा

### कारखानदारांना टँकरचा आधार

**कळंबोली : प्रतिनिधी**



तळोजा औद्योगिक वसाहतीतील कारखानदारांना पाणीटंचाई भेडसावत असून केमिकल झोन तसेच इतर ठिकाणी असलेल्या अनेक कारखान्यांना पिण्यासाठी व वापरासाठी मुबलक पाणी मिळत नसल्याने येथील कारखानदार हवालदिल झाले आहेत. तळोजा इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने याबाबत पाठपुरावा केला जात आहे.

मागील तीन आठवड्यांपासून कारखानदारांना पाणीटंचाई भेड्सावत असून योग्य अशा उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी सांगितले.

बारवी डॅमचे तळोजा एमआयडीसीला येणारे मुबलक पाणी हेदेखील इतर क्षेत्राकडे जात असल्याने सध्या कारखानदारांना पाण्याचे टँकर तसेच पिण्यासाठी बाहेरून पाणी मागवावे लागत असल्याचे कारखानदार सांगत आहेत. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे तळोजातील कारखानदारी ठप्प होण्याची भीती वर्तवली जात असून याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांना विनंती केली जात आहे.

तळोजातील औद्योगिक वसाहतीतील काही कारखान्यांना मुबलक पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे येथील कारखानदार कोलमडले असून या गंभीर प्रश्नाबाबत प्रशासने विचार विनिमय करून हा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा, अशी मागणी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांनी केली आहे.

## सीकेटी विद्यालयात बाल दिनाचा उत्साह

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन अर्थात बाल दिन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

इतिहास शिक्षिका सरोज जितेकर यांनी विद्यार्थ्यांना बाल दिन साजरा करण्यामागचा उद्देश काय याचे मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका नीरजा अधुरी यांनी बालदिनाचे महत्त्व सांगून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चरित्रातील आदर्शांचे पालन करा असा संदेश दिला तसेच त्यांनी लिहिलेली पुस्तके वाचा असेही सांगितले.

धवल पाटील, आर्या पवार, हिरण्य तुरे या विद्यार्थ्यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांची महती आपल्या भाषणातून सांगितली. इतिहास शिक्षकांनी वर्गावर्गात चाचा नेहरू यांच्या जीवन चरित्रातील काही गोष्टी सांगितल्या. गोष्टी, गाणी, अंताक्षरी अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करून बालदिन उत्साहात साजरा केला गेला. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



## रायगडात शिक्षकेतर कर्मचारी दिन उत्साहात

**कळंबोली : बातमीदार**



राज्यातील विद्यालयांचा प्रशासनातील डोलारा व प्रशासकीय कामकाज सांभाळणारे शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हा विद्यालय प्रशासनाचा कणा मानला जातो, मात्र हाच कर्मचारी शासनाच्या विविध सुविधांपासून वंचित राहिला आहे. शिक्षकेतरांच्या प्रतिनिधींनी १५ नोव्हेंबर १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ स्थापन केले. त्या दिवसापासून राज्यांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव १५ नोव्हेंबर या दिनी केला जातो. रायगड जिल्ह्यामधील शेकडो शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन शिक्षकेतर कर्मचारी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

१ मे रोजी कामगार दिन म्हणून गौरव होत असतो, मात्र राज्यातील लाखो शाळांमध्ये शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र शाळा प्रशासन सांभाळणारे शाळेचा कणा मानला जाणारे शिक्षकेतर कर्मचारी महत्व कोणत्याही गौरव वंचित राहिला आहे. शिक्षकेतर कर्मचारी संघटना श्रमिक संघ अधिनियमांतर्गत नोंदणीकृत असल्या तरी शिक्षकेतरांचा कामगार संज्ञेत समावेश होत नाही. येथेही शिक्षकेतर परत लांबच ठेवला जात आहे. यावर विचार करता शिक्षकेतरांचे राज्यस्तरावरील नेते, आभ्यासक, व विचारवंत सतीश नाडगौडा यांनी मांडलेला विचार सर्वसंमत झालेला आहे. शिक्षकेतरांच्या धुरिणांनी १५ नोव्हेंबर १९६७ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांचे महामंडळ स्थापन केले. त्यानंतर वेळोवेळीच्या संघर्ष, आंदोलनांमुळे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन्शन, केंद्राप्रमाणे वेतन/वेतनश्रेणी/भत्ते, चिपळूणकर समिती शिफारशी, तसेच सेवा विषयक सर्व लाभ मिळवून दिलेले आहेत. अन् ते मिळतच राहणार आहेत. ते कायम राहण्यासाठी राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकसंधतेची गरज आहे. याकरिता १५ नोव्हेंबर हा शिक्षकेतर दिन म्हणून राज्यभर शाळांतून साजरा करण्याचे ठरवले गेले.

यानुसार रायगड जिल्हा शिक्षकेतर कर्मचारी महामंडळाचे सचिव मिलिंद बाळकृष्ण जोशी यांच्या सूचनेप्रमाणे रायगड जिल्ह्यातील शेकडो शाळातून शिक्षकेतर कर्मचारी दोन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे मुख्याध्यापक व शिक्षकांकडून पेन, पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या शिक्षकेतर कर्मचारी महामंडळाला रायगड जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी जोस्तना पवार शिंदे यांनीही लेखी स्वरूपात शुभेच्छा देऊन गौरविले आहे. विविध शाळांमधून निवृत्त झालेले ही वरिष्ठ लेखनिकांचाही त्या विद्यालयात सन्मानपूर्वक बोलावून सत्कारही करण्यात आला. अनेक वर्षानंतर प्रथमच शिक्षकेतर कर्मचारी दिन हा राज्यात उत्साह पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

# निजामपूर बायपासचा प्रश्न ऐरणीवर!

## ■ रस्त्यालगत पार्किंग, अरुंद रस्ता, एमआयडीसीच्या वाढत्या वाहतुकीने जाताहेत बळी

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील निजामपूर शहरातून दिघी–माणगाव–पुणे हा महत्वाच्या राज्य मार्ग जातो. त्यामुळे या ठिकाणच्या बाजारपेठेत दिवसेंदिवस वाहनांची गर्दी वाढत आहे. त्यातच हा रस्ता अरुंद असल्यामुळे तसेच रस्त्याकडेला असणाऱ्या बेकायदेशीर वाहन पार्किगमुळे अपघाताला निमंत्रण मिळत आहे. गेल्याच महिन्यात निजामपूर बाजारपेठेत एका तरुणाला आपला नाहक जीव गमवावा लागला होता. नियमीत वाहतूक कोंडी, वाढते अपघात यामुळे निजामपूर शहराबाहेरून काढण्यात येणाऱ्या रस्त्याचा (बायपास) प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.


(छाया : सलीम शेख)

विभागातील प्रमुख बाजारपेठ असणाऱ्या निजामपूर शहरातील अवैध वाहन पार्किंगमुळे वाहनांचे अपघात होत आहेत. काही दिवसांपुर्वी बस स्थानक परिसरात झालेल्या अपघातामध्ये एका तरुणाला जीव गमवावा लागला होता. गेल्या काही महिन्यांपासून शहरात अवैध पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे.

निजामपूर एसटी स्थानक, बाजारपेठ परिसरात नागरिकांची सतत वर्दळ असते. तसेच वाहनांची मोठी गर्दी होते. हा रस्ता अरूंद असल्यामुळे एकाचवेळी दोन मोठी वाहने आल्यास त्यांना साईडपट्टीचा उपयोग करावा लागतो. त्यातच रस्त्याकडेला उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे या मार्गावर सतत वाहतूक कोंडी होत असते. त्यातच विळे–भागाड औद्योगिक क्षेत्रात जाणारी व येणारी अवजड वाहने, कर्मचारी व कामगारांना ने–आण करणाऱ्या बस यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे.

निजामपूर शहरामधून पुणे तसेच मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे शॉर्टकट म्हणून वाहनचालक या रस्त्याला पसंती देत आहेत. रुग्णवाहिकादेखील याच मार्गाने मुंबईकडे जात असतात. त्यातच निजामपूर परिसरातील किल्ले मानगड, किल्ले कुर्डुपेठ (विश्रामगड) पाहण्यासाठी पर्यटक नेहमी येत असतात. रायगड किल्लाही येथून फक्त २८ कि.मी. अंतरावर असल्याने मोठ्या प्रमाणात पर्यटक निजामपूर मार्गेच प्रवास करणे पसंत करतात. त्यामुळे निजामपुरमधील रहदारीचे प्रमाण वाढले आहे. बाजारपेठेतूनच महामार्ग गेल्याने तसेच विळे–भागाड एमआयडीसीमधील कंपन्यांची मालवाहतूक व बसेसदेखील काही प्रमाणात याच मार्गे होत असते. त्यामुळे निजामपूर शहरात नेहमी वाहतूक पहायला मिळत आहे. पुणे बाजूकडून येणारे व जाणारे वाहन चालक आपली वाहने वेगात चालवत असून या रस्त्यालगत शाळा, विद्यालये, आयटीआय व विविध कोर्सेससाठी विद्यार्थी निजामपूर परिसरातूनच नव्हे तर अन्य तालुक्यातून मोठ्या प्रमाणात शिक्षणासाठी येतात. परिसरातील शेकडो गावातील नागरिक खरेदीसाठी निजामपूर बाजारपेठेत येतात. त्यामुळे निजामपुरमध्ये सतत वाहतूक कोंडी होत आहे. यावर पर्याय म्हणून राज्य रस्ते विकास खात्याकडून निजामपूर शहराबाहेरून बायपास प्रस्तावीत केला होता. त्याची पाहणीही सबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. तो बायपास रस्ता आजही प्रलंबित आहे. तो रस्ता कधी मंजूर होणार असा सवाल उपस्थित होत आहे.

दरम्यान, निजामपूर बायपास रस्त्याबाबत माहिती घेण्यासाठी महाराष्ट्र रस्तेविकास महामंडळाचे उपअभियंता निफाडे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो होऊ शकला नाही.

# १२० अश्वशक्तीच्या नौकांनाही मिळणार डिझेल परतावा

## आमदार रमेश पाटील यांनी मानले शासनाचे आभार

**मुरुड : प्रतिनिधी**

राज्यातील १२० अश्वशक्ती क्षमतेच्या नौकांना डिझेल परतावा देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबत अधिसूचना काढण्यात आली आहे. त्याबद्दल मच्छीमार आणि मच्छीमार सहाकरी संस्थांनी राज्य सरकारचे आभार मानले आहेत.

राज्यातील मच्छीमार सहकारी संस्था आणि त्यांच्या सभासदांच्या १२० अश्वशक्ती क्षमतेवरील नौकांचा डिझेल कोटा व मूल्यवर्धित कराची प्रतिपुर्ती (परतावा) बंद करण्यात आला होता. त्याला मच्छीमार आणि संस्थांनी जोरदार विरोध केला होता. राज्यात शिंदे–फडणवीस सरकार सत्तेवर आल्यानंतर कोळी महासंघाचे अध्यक्ष भाजप आमदार रमेश पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांची भेट घेऊन या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आणून दिले दिले होते.

राज्य शासनाने १२० अश्वशक्ती क्षमतेवरील नौकांदेखील डिझेल पुरवठा आणि डिझेल परताव्यासाठी पात्र असल्याचा निर्णय घेतला. आज तशी अधिसूचनाही काढण्यात आली. त्याबद्दल कोळी महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी, सरचिटणीस राजहंस टपके तसेच भाजपा मच्छीमार सेलचे अध्यक्ष ॲड. चेतन पाटील यांनी राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

> **राज्य शासनाने १२० अश्वशक्ती क्षमतेच्या नौकांनाही डिझेल परतावा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अनेक मच्छीमारांना मोठा दिलासा मिळणार आहे. कोकणातील समस्त कोळी बांधव राज्य शासनाप्रती आभार व्यक्त करत आहेत.**
>
> 
>
> **–रमेश पाटील, आमदार, भाजप**

# डॉक्टरांच्या अनियमितपणाचा बसतोय रुग्णांना फटका!

## माणगाव उपजिल्हा रुग्णालयात बसावे लागते ताटकळत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील काही डॉक्टर वेळेत आपले काम सुरु करीत नसल्यामुळे तेथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना त्यांची वाट पाहात ताटकळत बसावे लागत आहे. त्यामुळे अनेक रुग्ण उपजिल्हा रुग्णालयात मोफत उपचार घेण्याऐवजी खाजगी दवाखान्याचा रस्ता पकडत आहेत. येथील कामचुकार डॉक्टरांवर कारवाई करावी,अशी मागणी जोर धरू लागली आहे.



माणगाव उपजिल्हा रुग्णालयात शासनाकडून विविध सोयी,सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मात्र डॉक्टरांची काही तर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. तात्पुरत्या स्वरूपात काही डॉक्टर अर्धवेळ तर काही पुर्णवेळ काम करतात. या डॉक्टरांचे आठवड्यातील वार ठरलेले आहेत. त्यांच्या वॉर्डबाहेर फलकावर आठवड्याचे दिवस लिहिले आहेत, मात्र वेळा लहिलेल्या नाहीत तसेच संबंधित डॉक्टरांचे संपर्कासाठी मोबाइल नंबर लिहिणे गरजेचे आहे, जेणे करून एखाद्या रुग्णाला संबंधित डॉक्टरांकडे संपर्क करता येईल तसेच त्या डॉक्टरांची वेळ पाहून उपचारासाठी येणे सोयीस्कर होईल.

माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील काही डॉक्टर मर्जीप्रमाणे रुग्णालयात येऊन काम करतात. तर काही डॉक्टर वेळेपूर्वीच निघून जातात. याठिकाणी काम करणाऱ्या काही डॉक्टरांना राजकीय वरदहस्त असल्याने ते मर्जीप्रमाणे वागत आहेत. या बाबत रुग्णांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.


याबाबत माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी अधीक्षक डॉ. गोमसाळे यांच्याकडे संपर्क साधला असता, त्यांनी अशा कामचुकार डॉक्टरांना समज देवून वेळेनुसार रुग्णालयात काम पाहावे, अशा सूचना देणार असल्याचे सांगितले.

# फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक

## माणगाव पोलिसांची कारवाई; काही रक्कम हस्तगत

**माणगाव : प्रतिनिधी**

सिडकोत नोकरी लावतो असे सांगून तरुणाची एक लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपींना माणगाव पोलिसांनी नवी मुंबई येथून अटक केली.




सिडकोत नोकरी लावतो सांगून तसेच खोटे नियुक्तपत्र देऊन संकेत अशोक मुंढे (वय २३, रा. वाकडई नगर, ता. माणगाव सध्या रा. चेंबूर मुंबई), अनिकेत बाळाराम तांडेल (वय २५, रा. सुकापूर, नवीन पनवेल), सौरभ सदू भोनकर (वय २५, रा. विकास कॉलनी, समतानगर, माणगाव) व त्यांच्या इतर साथीदारांनी भावेश सुनील मोरे याची एक लाख ८३ हजार ५५० रुपयांची फसवणूक केली होती. याबाबत भावेश मोरे याने माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

या गुन्ह्यातील आरोपींना माणगाव पोलिसांनी नवी मुंबई येथून अटक केली असून त्यांच्याकडून ७५ हजार रुपये हस्तगत करण्यात आले आहेत. सदरची कामगिरी माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील, सहाय्यक निरीक्षक सतीश अस्वर, शिपाई अमोल पोंधे, नाथा दहिफळे, रामनाथ डोईफोडे, शाम शिंदे,पोलीस नाईक अक्षय पाटील, तुषार घरत यांनी केली.

दरम्यान, शासकीय खात्यात अथवा इतर ठिकाणी नोकरी लावतो असे सांगून कोणी पैसे मागत असल्यास बेरोगार तरुणांनी अथवा पालकांनी त्याला बळी पडू नये, असे आवाहन माणगाव पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.

# पेणमध्ये शिवराज्य प्रतिष्ठानचा वर्धापन दिन उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

शिवराज्य प्रतिष्ठानचा प्रथम राज्यस्तरीय वर्धापन दिन सोमवारी (दि १४) पेणमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर युवराज छत्रपती संभाजी राजे, पेणचे माजी आमदार धैर्यशील पाटील, माजी नगराध्यक्ष सुनिल पाटील, निलेश पाटील, विनोद साबळे, मंगेश दळवी, माजी सभापती डी. बी. पाटील रघुनाथ दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

शिक्षण घेतल्याशिवाय आपण पुढे जाऊ शकत नाही, हाच मंत्र शिवराज्या प्रतिष्ठान घेतला आहे. लोक सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांना आपल्यावर अन्याय होत आहे, हे समजणार नाही असे छत्रपती संभाजीराजे या वेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून बाळगंगा प्रकल्पग्रस्ताचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी या वेळी दिले.


(छाया : अरूण नलावडे)

# खंडाळा घाटामध्ये पाणपोई

## आईच्या स्मरणार्थ खोपोलीतील ऋषभ शेळके यांचा उपक्रम

**खालापूर : प्रतिनिधी**

कोकण दिंडीच्या माध्यमातून पायी दिंडीने निघालेल्या वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची मोफत सोय व्हावी, या हेतूने वरची खोपली येथील सामजिक कार्यकर्ते ऋषभ शेळके यांनी त्यांच्या मातोश्री कै. दिपाली दिलीप शेळके यांच्या स्मरणार्थ खंडाळा घाटात पाणपोईची सेवा सुरू केली आहे. या उपक्रमाचा नुकताच शेळके कुटुंबीय आणि मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

कोकण दिंडीच्या माध्यमातून शेकडो वारकरी दरवर्षी आषाढी, कार्तिकी एकादशीला व अन्य वेळी खंडाळा घाटातून पायी प्रवास करीत असतात. त्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, म्हणून सामजिक कार्यकर्ते ऋषभ शेळके यांच्या प्रयत्नातून मातोश्री कै. दिपाली दिलीप शेळके यांच्या स्मरणार्थ खंडाळा घाटात मोफत पाणपोई सेवा सुरू करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते मंगेश काळोखे, सागर मोरे, संतोष ठाकोळ यांच्यासह वरची खोपोलीतील मित्रमंडळी आणि शेळके कुटुंबीय यांच्या उपस्थितीत या पाणपोई उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या समाजोपयोगी सेवेबद्दल शेळके कुटुंबियांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'नागरिकांनी आधार कार्ड अद्ययावत करून घ्यावे'

**अलिबाग : जिमाका**

ज्या नागरिकांना आधार कार्ड मिळाले आहे, परंतु दहा वर्षांमध्ये एकदाही अद्ययावत केलेले नाही, अशा आधार कार्डधारकांसाठी डॉक्युमेंट अपडेट हे नवीन फिचर विकसित करण्यात आले आहे. नागरिकांनी ओळखीचा पुरावा आणि रहिवासी पुरावा कागदपत्रे अद्ययावत करून त्यांचा आधार अद्ययावत करणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांना डॉक्युमेंट अपडेट करण्याचे आहे, त्यांनी माय आधार (ऑनलाइन) पोर्टलद्वारे किंवा कोणत्याही आधार नोंदणी केंद्र भेट देऊन आपले आधार कार्ड अद्ययावत करण्यात यावे.

देशात २०११पासून युनिक आयडेंटिफिकेशन थॉरिटीज ऑफ इंडियामार्फत नागरिकांना आधार कार्ड देण्यात येते. बायोमेट्रिक प्रमाणिकरणासह रहिवाशाची ओळख पटविण्यासाठी आधार कार्ड हा ओळखीचा सर्वात व्यापकपणे स्वीकारला जाणारा पुरावा आहे. नागरिकांकडून अनेक शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी आधार कार्डचा वापर केला जातो. यापुढे शासकीय व इतर सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना नवीन आणि अद्ययात तपशीलांसह आधार कार्ड सादर करणे आवश्यक आहे, याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) तथा नोडल अधिकारी सर्जेराव मस्के–पाटील यांनी कळविले आहे.

# कर्जतमध्ये भगवान बिरसा मुंडांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी मंगळवारी (दि. १५) अभिवादन केले.

कर्जत नगर परिषद कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला रवींद्र लाड, बापू बहिरम, अविनाश पवार, दयानंद गावंड, हरिश्चंद्र वाघमारे, हृदयनाथ गायकवाड, निलेश देशमुख, कल्याणी लोखंडे, विभावरी म्हामूणकर, दिलीप लाड, निलेश निकाळजे, शेखर लोहकरे, रुपेश पाटील, महेंद्र पवार, सुदेश गायकवाड, सामिया चौगुले, मुकेश परदेशी, जयवंत उघडा, महेश दाभणे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.


(छाया : विजय मांडे)

# मुरूड नगर परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजला भेट


(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

शालेय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबद्दल माहिती करून देण्यासाठी मुरूडमधील अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजने बालदिनाचे औचित्यसाधून सोमवारी (दि. १४) नगर परिषद प्राथमिक शाळा क्र. ४च्या विद्यार्थ्यांना पाचारण केले होते. या वेळी विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या शैक्षणिक कामकाजाविषयी माहिती देण्यात आली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन (१४ नोव्हेंबर) बाल दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याच अनुषंगाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजतर्फे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड नगर परिषद शाळा क्र. ४मधील विद्यार्थ्यांना महाविद्यालय भेटीचे आमंत्रण दिले होते. या भेटीदरम्यान शालेय विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन कामकाजाविषयी माहिती देण्यात आली. त्यासाठी नगर परिषदेच्या प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, मुख्याध्यापिका राजश्री गजने, सहाय्यक शिक्षक भरत शिंदे, अभिजीत ठाकूर यांचे विशेष सहकार्य लाभले.

डिग्री कॉलेजचा राष्ट्रीय सेवा योजना, डीएलएलई व महिला विकास कक्षातर्फे डॉ. स्वाती खराडे, प्रा. श्रुती कारभारी, प्रा. शोएब खान, प्रा. नितीन पवार तसेच नईमा चोगले, सुमेरा कडू, अजमा जबीन, दरोगे इकरा या विद्यार्थ्यांनी उपक्रम यशस्वी केला.

# रोह्यात विद्यार्थ्यांचा गुणगौरव, शैक्षणिक साहित्याचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

पं. जवाहरलाल नेहरू जयंती निमित्त रोहा तालुक्यातील महादेववाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सोमवारी (दि. १४) दक्षिण रायगड भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

बालदिनाचे औचित्यसाधून महादेववाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या चमच्या–लिंबू, मडका फोडणे, सुईमध्ये धागा ओवने, बादलीतील वाटीत खडा टाकणे, बकेटमध्ये बॉल टाकणे आदी स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील प्रत्येक विद्यार्थ्यांना युवा मोर्चाच्या वतीने शालेय वस्तू भेट देण्यात आल्या. या वेळी अमित घाग यांनी व्यक्त केले.

युवा मोर्चाचे जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, भाजपचे धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, रोहा तालुका कामगार मोर्चा अध्यक्ष विलास डाके, राजमुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश डाके, संकेत मोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निलेश सुतार, कैलाग जंगम यांच्यासह दीपक फाउंडेशनचे सदस्या, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# पोलार्डचा आयपीएलला अलविदा!

## मुंबई संघातून वगळल्यानंतर मोठा निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

इंडियन प्रीमिअर लीगच्या आगामी २०२३मधील पर्वात मुंबई इंडियन्स संघाचा सर्वांत अनुभवी खेळाडू किरॉन पोलार्ड वगळणार असल्याची चर्चा सुरू असताना वेस्ट इंडिजच्या स्टार खेळाडूनेच आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली.

> **मुंबई इंडियन्सला गुडबाय बोलताना खूप दुःख होतंय, पण मी मुंबई इंडियन्सच्या फलंदाजी प्रशिक्षकाची जबाबदारी घेण्यास तयार आहे आणि मुंबई इंडियन्स एमिरेट्सकडून खेळणार आहे. हा नवा चॅप्टर माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरणार आहे.**
>
> **-किरॉन पोलार्ड**

आयपीएल २०२३साठी मिनी ऑक्शन होणार आहे आणि १५ नोव्हेंबर ही सर्व फ्रँचायझींना त्यांच्या रिटेन व रिलीज केलेल्या खेळाडूंची नावे जाहीर करण्याची शेवटची तारीख आहे. या ऑक्शनआधी किरॉन पोलार्डने आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली. मुंबई संघ त्याला आगामी हंगामातून वगळणार असल्याची चर्चा होती. पोलार्डने मुंबईकडून १८९ सामन्यांत ३,४१२ धावा केल्या आणि ६९ विकेट्स घेतल्या आहेत.

निवृत्तीबाबत पोलार्डने ट्वीट करून म्हटले की, हा निर्णय माझ्यासाठी घेणे सोपे नव्हते. मला आणखी काही वर्ष खेळायची होती, परंतु मुंबई इंडियन्ससोबत झालेल्या चर्चेनंतर मी आयपीएलमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला. या फ्रँचायझीसोबतचा प्रवास अविश्वसनीय होता आणि मी बरेच काही साध्य केले. त्यामुळे मुंबई इंडियन्सविरुद्ध मी खेळू शकत नाही.

## भारताविरुद्धच्या मालिकेसाठी न्यूझीलंड संघ जाहीर

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडने भारताविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी आपला संघ जाहीर केला आहे. कर्णधार केन विल्यमसन न्यूझीलंडचे नेतृत्व करणार आहे, मात्र अनुभवी सलामीवीर मार्टिन गप्टिल आणि डावखुरा वेगवान गोलंदाज ट्रेंट बोल्ट यांना संघात स्थान देण्यात आलेले नाही.

**टी-२० संघ :** केन विल्यमसन (कर्णधार), फिन अ‍ॅलन, मायकेल ब्रेसवेल, डेव्हॉन कॉनवे, लॉकी फर्ग्युसन, डॅरिल मिशेल, अ‍ॅडम मिल्ने, जिमी नीशम, ग्लेन फिलिप्स, मिचेल सँटनर, ईश सोधी, टिम साउथी, ब्लेअर टिकनर

**एकदिवसीय संघ :** केन विल्यमसन, फिन ऍलन, मायकेल ब्रेसवेल, डेव्हॉन कॉनवे, लॉकी फर्ग्युसन, मॅट हेन्री, टॉम लॅथम, डॅरिल मिशेल, अ‍ॅडम मिल्ने, जिमी नीशम, ग्लेन फिलिप्स, मिचेल सँटनर, टिम साउदी.

## नेमबाजी प्रशिक्षक सुमा शिरूर यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र सरकारच्या क्रीडा विभागाचा सर्वोच्च मानाचा समजला जाणारा द्रोणाचार्य क्रीडा पुरस्कार रायगड जिल्ह्यातील नवीन पनवेल येथे राहणार्‍या सुमा सिद्धार्थ शिरूर यांना जाहीर झाला आहे. याआधी यापूर्वी २००३मध्ये सुमा यांना अर्जुन पुरस्काराने सन्मानित केले गेले आहे.



राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील नेमबाजी स्पर्धांमध्ये सुमा शिरुर यांनी विविध पदके कमावून देशाचे नाव उंचावले आहे. त्यानंतर त्यांनी पॅरा शूटिंग या खेळ प्रकारात विविध विद्यार्थी घडवून त्यांना मोलाचे मार्गदर्शन केल्याने शिरुर यांना या पुरस्काराचा मान मिळाला आहे.

३० नोव्हेंबरला देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रपती भवनात सुमा शिरुर यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती रायगड जिल्ह्याच्या माहिती व जनसंपर्क विभागाने दिली. शिरूर यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर रायगड जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## विजय आर्मी स्कूलचे व्हॉलीबॉलमध्ये सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील पळस्पे येथील एमएनआर स्कूल येथे झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत व्हॉलीबॉलमध्ये विजय आर्मी स्कूल चिखले शाळेतील मुलांच्या १७ वर्षांखालील संघाने विजेतेपद आणि १९ वर्षांखालील संघाने उपविजेते पटकाविले.

यशस्वी विद्यार्थ्यांना व्हॉलीबॉलचे मार्गदर्शन जितू पाटील, क्रीडा शिक्षक देविदास पाटील, आर. एस. पाटील व एस. ए. शेख यांनी केले.

विजेत्या व उपविजेत्या संघातील विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शकांचे रुक्मिणीबाई प्रतिष्ठान संस्थेचे कार्याध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील व शाळेचे प्राचार्य एम. के. मराठे, कमांडर पीव्हीआर कृष्णन यांनी अभिनंदन केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांनीही कौतुक केले.

## एसएसओएसपी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे यश

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील एसएसओएसपी कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सुयश संपादन केले आहे.

नागोठणे कॉलेजच्या भाविक अनंत घाटवळ या विद्यार्थ्याने रसायनीतील पिल्लई इंजिनिअरिंग कॉलेज येथे झालेल्या झोनल अ‍ॅथलेटिक्समध्ये १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदक जिंकले. त्याचप्रमाणे पुण्यातील लोणीकंद येथे रामचंद्र पॉलिटेक्निक या ठिकाणी झालेल्या मुलींच्या कबड्डी स्पर्धेत डिप्लोमा कॉलेजच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले.



(छाया : राज वैशंपायन)

कबड्डी संघाची कर्णधार हर्षाली म्हात्रे हिने मोलाची कामगिरी केली. सेजल पाटील, वैष्णवी अडूरकर, सानिका कदम, क्षितिज पाटील, तृप्ती घाग, धनश्री म्हात्रे यांनी तिला चांगली साथ दिली. राखीव गटात पूर्वा फाटक, ऐश्वर्या सातमकर, मोनिका विश्वकर्मा, सानिका मोरे, प्रेरणा पाटील होत्या. संघ व्यवस्थापक म्हणून तेजस्वी म्हात्रे व सोनाली पाटील यांनी काम पाहिले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे कॉलेजचे संस्थापक किशोर जैन, सीईओ कार्तिक जैन, प्रिन्सिपल, अ‍ॅडमिन्सट्रेशन ऑफिस वैभव नांदगावकर, राहुल घरत, हेड चैतन्य भगत, कॉलेज स्पोर्ट कमिटी मेंबर्स यांनी अभिनंदन केले.

## भारत भूषविणार वनडे वर्ल्डकपचे यजमानपद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी)च्या वतीने सन २०२३मध्ये होणार्‍या वन डे फॉर्मेटच्या वर्ल्डकप स्पर्धेचे यजमानपद भारताकडे असणार आहे. यापूर्वी भारताने शेजारील देश पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ल्डकपचे आयोजन केले होते. पुढील वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होणार्‍या वर्ल्डकपचे आयोजन भारत एकटा करणार आहे. भारतातील दहा शहरांमध्ये या वर्ल्डकपचे सर्व सामने खेळवले जाणार आहेत.



वर्ल्डकपचा पहिला सामना १४ ऑक्टोबर २०२३ रोजी खेळवला जाणार आहे, तर उपांत्य फेरीतील पहिला सामना २३ नोव्हेंबरला व दुसरा २४ नोव्हेंबरला खेळवण्यात येईल. अंतिम सामन्याचा थरार २६ नोव्हेंबरला रंगणार आहे, अशी माहिती भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी दिली.

वर्ल्डकपच्या अंतिम सामन्याचा थरार कोलकाताच्या ईडन गार्डन मैदानात रंगणार असल्याची चर्चा आहे. याबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आली नाही, मात्र वर्ल्डकपचा उपांत्य फेरीतील आणि अंतिम सामना ईडन गार्डनच्या मैदानात खेळवला जाणार असल्याचे जवळपास निश्चित असल्याचे बोलले जात आहे. अंतिम सामन्याच्या आयोजनाच्या स्पर्धेत दिल्ली आणि मुंबईचे स्टेडियमही आहेत यावर लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे.

संपूर्ण देशभरात विस्तारलेल्या शहरांमध्ये वर्ल्डकपचे सामने खेळवले जाणार आहेत तसेच पहिल्यांदाच उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ आणि कानपूरही वर्ल्डकपच्या सामन्यांचे साक्षीदार ठरणार आहेत. अंतिम सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवला जाण्याची शक्यताही आहे. सर्वांत जास्त प्रेक्षकांना बसण्याची आसनव्यवस्था या स्टेडियमचे खास वैशिष्ट्य आहे. या स्टेडियममधून तब्बल एक लाख ३२ हजार क्रिडाप्रेमींना क्रिकेटचा सामना पाहता येऊ शकतो, तर कोलकाताच्या ईडन गार्डनमध्ये ६६ हजार प्रेक्षकांसाठी आसनव्यवस्था आहे.

**या शहरांमध्ये होणार सामने**

इकाना स्टेडियम लखनौ, ग्रीन पार्क स्टेडियम कानपूर, इडेन गार्डन कोलकाता, एम. ए. चिदंबरम स्टेडियम चेन्नई, अरुण जेटली स्टेडियम दिल्ली, नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद, राजीव गांधी स्टेडियम हैदराबाद, वानखेडे स्टेडियम मुंबई, पीसीए स्टेडियम मोहाली पंजाब, एम. चिन्नास्वामी स्टेडियम बंगळुरू.

## धोनी होणार टीम इंडियाचा संचालक?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) आयोजित स्पर्धांमध्ये टीम इंडियाच्या वारंवार अपयशानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीला भारतीय क्रिकेटमध्ये कायमस्वरूपी भूमिकेसाठी बोलावण्याचा विचार करत आहे. धोनीला डायरेक्टर ऑफ क्रिकेट (क्रिकेट संचालक)पदी नियुक्त केले जाऊ शकते, अशी सूत्रांची माहिती आहे.

ऑस्ट्रेलियातील टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाचा इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात दारुण पराभव झाला. 'द टेलिग्राफ'च्या अहवालानुसार मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांना तिन्ही फॉरमॅटचे व्यवस्थापन करण्याचा भार खूप जास्त आहे, असे वाटल्याने बीसीसीआय प्रशिक्षकपदाची भूमिका विभाजित करण्याचा विचार करीत आहे. धोनीचा टी-२० फॉरमॅटमध्ये समावेश करून भारतीय क्रिकेट संघाचा दर्जा उंचावण्यासाठी बोर्ड प्रयत्नशील आहे. अहवालानुसार या महिन्याच्या अखेरीस सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत या विषयावर चर्चा केली जाईल.

याआधी धोनीने २०२१ साली यूएईमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषकादरम्यान संघासोबत काम केले होते, परंतु तो अंतरिम आधारावर त्यांच्यासोबत होता. जवळपास आठवडाभराच्या सहभागासह संघ आधीच स्पर्धेतून बाहेर पडला होता. तथापि, बीसीसीआयला वाटते की, अधिक महत्त्वपूर्ण भूमिका निश्चितपणे भारतीय टी-२० स्थापित करण्यात मदत करेल.

पुढील वर्षी होणार्‍या आयपीएलनंतर धोनी खेळातून निवृत्त होणार असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. बीसीसीआय त्याच्या अनुभवाचा आणि तांत्रिक कौशल्यांचा योग्य वापर करण्यास उत्सुक आहे आणि त्यात माजी भारतीय कर्णधाराचा समावेश असेल. दुहेरी विश्वचषक विजेत्याला विशेष खेळाडूंसोबत काम करण्यास आणि भारतीय टी-२० संघाचे व्यवस्थापन करण्यास सांगितले जाऊ शकते.

## कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ रवाना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने ४८व्या कुमार गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता आपला अंतिम संघ जाहीर केला. कोल्हापूरच्या दादासो पुजारी याच्याकडे संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली. हा संघ मंगळवारी (दि. १५) स्पर्धेसाठी रवाना झाला.

उत्तराखंड राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने १७ ते २० नोव्हेंबर या कालावधीत ऋषिकेश, हरिद्वार येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ गेले आठ दिवस प्रशिक्षक केतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर येथील खडतर सरावानंतर स्पर्धेसाठी तयार झाला आहे.



गतवर्षी महाराष्ट्राच्या संघाला पहिल्या चार संघात स्थान मिळविता आले नव्हते. यंदा ती कसर भरून काढण्याचा प्रशिक्षक गायकवाड व व्यवस्थापक लक्ष्मण बेल्लाळे यांचा मानस असेल.

निवडण्यात आलेला संघ परभणी येथून सचखंड एक्स्प्रेसने स्पर्धेकरिता रवाना झाला. त्या वेळी त्यांना शुभेच्छा देण्याकरिता राज्य कबड्डी असोसिएशनचे कोषाध्यक्ष मंगल पांडे व परभणी जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी रेल्वेस्थानकावर हजर होते.

**असा आहे संघ :**

दादासो पुजारी कर्णधार (कोल्हापूर), शिवम पठारे उपसंघनायक (अहमदनगर), धीरज बैलमारे (रायगड), संदेश देशमुख (बीड), प्रतीक जाधव (पालघर), अजित चौहान (पुणे), रजतकुमार सिंग (मुंबई उपनगर), वैभव वाघमोडे (सांगली), वैभव कांबळे (परभणी), वेद पाटील (रत्नागिरी), तेजस काळभोर (नंदुरबार), याकूब पठाण (नांदेड). प्रशिक्षक केतन गायकवाड, व्यवस्थापक लक्ष्मण बेल्लाळे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com